शनिवार, २३ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ५२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 23 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-52 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# चार दिवस पावसाचे

## मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात मुसळधार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्याच्या बहुतांश भागात पुढील चार दिवस मध्यम ते मुसळधार स्वरुपात पाऊस पडणार असल्याचे संकेत भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिले आहेत. झारखंडमध्ये तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता कमी झाली असून सध्या ते चक्रीय स्थितीमध्ये आहे. याच वेळी सिक्कीम ते दक्षिण महाराष्ट्र म्हणजेच विदर्भ मराठवाड्यापर्यंत कमी दाबाची रेषा सक्रीय झाली आहे. त्यामुळे पुढील ४८ तासांत राज्यात चौफेर कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडणार आहे.**

या महिन्यात तीन आठवडे पावसाने दडी मारली असली तरी पुढील आठवडा पावसाचा ठरणार आहे. पुणे कार्यालयातील हवामान अंदाज प्रमुख डॉ. अनुपम कश्यपी म्हणाले, प्रामुख्याने रायगड, गोंदिया, भंडारा आणि नागपूर भागातील बहुतांश भागात पुढील दोन दिवस मुसळधार ते जोरदार पाऊस शक्यता असल्याने आम्ही ऑरेंज अलर्ट दिला आहे. राज्याच्या उर्वरित भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडणार आहे. २४ ते २६ सप्टेंबर दरम्यान कोकण, मध्यमहाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. येत्या २५ आणि २६ सप्टेंबरला मात्र राज्याच्या संपूर्ण भागात मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडणार आहे. पुण्यामध्ये पुढील दोन दिवस आकाश मुख्यतः ढगाळ राहणार आहे. दिवसभरात हलका ते अतिहलक्या स्वरुपाचा पाऊस पडेल. तसेच सोमवार आणि मंगळवारी हलका ते मध्यम स्वरुपाचा आणि घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता कश्यपी यांनी व्यक्त केली. दरम्यान, पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दुपारी ४ ते ५ च्या दरम्यान मध्यम स्वरुपाच्या पावसाने हजेरी लावली. शहरात सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारनंतर उकाडाही वाढला होता. चारच्या सुमारास ढग दाटून आले आणि सुरुवातीला उपनगरांत, काही वेळातच संपूर्ण शहरात चौफेर पाऊस पडला. अचानक जोराच्या सरी आल्याने रस्त्यावर कामासाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची धांदल उडाली. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही हातातील कामे अर्धवट ठेवून मांडवाच्या सुरक्षेची चाचपणी केली. मराठवाड्यातही गुरुवारी रात्री बहुतांश भागात जोरदार पाऊस झाला. वाशिम जिल्ह्यात विजांच्या कडकडाटांसह पाऊस झाला असून वीज पडून दोन जनावरांचा मृत्यू झाला आहे.



छत्रपती संभाजीनगरचे आराध्य दैवत... विद्येचा अधिपती... संस्थान गणपती : छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

# खासदाराची लोकसभेत शिवीगाळ

## विरोधी पक्षांनी उठवली भाजपावर टीकेची झोड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** लोकसभेचे भाजपा खासदार रमेश बिधुरी यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. रमेश



बिधुरी यांनी बहूजन समाज पक्षाचे खासदार दानिश अली यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते. यानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आपसह विविध विरोधी पक्षांनी बिधुरी यांच्या वक्तव्यावरून भाजपावर टीकेची झोड उठवली आहे. अशातच भाजपाकडून रमेश बिधुरी यांच्याविरोधात मोठे पाऊल उचलण्यात आले आहे.

रमेश बिधुरी संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी लोकसभेचा चांद्रयान-३च्या यशबाबत बोलत होते. तेव्हा बसपाचे खासदार दानिश अली यांनी चांद्रयान-३ मोहिमेचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाटल्याचा आरोप केला. त्यावर रमेश बिधुरी संतापले आणि अपशब्दांचा उपयोग केला. मोदीजी श्रेय घेत नाहीयेत. श्रेय देशाचे वैज्ञानिक घेत आहेत. ए भ**ए उग्रवादी.. बोलू देणार नाही तुला कधी उभे राहून. सांगून ठेवतोय. ए उग्रवादी.. कठुवेहे दहशतवादी आहेत उग्रवादी आहेत.. हे मुल्ला दहशतवादी आहेत. याचे काही ऐकू नका, बाहेर फेका याला", असे रमेश बिधुरी म्हणत असल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. यानंतर आता दानिश अली यांच्याबाबत वापरलेल्या अपशब्दांबद्दल रमेश बिधुरी यांना भाजपाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या सूचनेवरून बिधुरी यांना भाजपाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती सूत्रांनी 'एएनआय'ला दिली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ शिंहे यांनी बिधुरी यांच्या विधानांवरून लोकसभेत दिलगिरी व्यक्त केली आहे. जर (सत्ताधारी) सदस्यांच्या कोणत्याही विधानामुळे विरोधी पक्षांच्या भावना दुखावल्या अशतील, तर मी त्यासाठी दिलगिरी व्यक्त करतो, असे राजनाथ सिंह म्हणाले.

# लाकडी गौरींचा त्याग; सुनांचे केले पूजन



आधुनिक केसरी न्यूज

**सचिन मोरे**

**कंधार :** लाकडी गौरी पुजनांच्या पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या परंपरेचा त्याग करत आपल्या तीन सुनांचे विधिवत पूजन करत त्यांच्या यथायोग्य सन्मान करत लाकडांच्या गौरीऐवजी माझ्या तीन सुनाच माझ्या जिवंत गौरी आहेत, असा संदेश माजी जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र येईलवाड यांनी एका कार्यक्रमातून दिला आहे. प्राचीन काळापासून भारतामध्ये अनेक सण उत्सव मोठ्या उत्सहात साजरे केले जातात. त्यात गौरीपूजन हा सण सर्वत्र मोठ्या हर्ष उल्हासात, जल्लोशात साजरा करण्यात येतो हिंदू धर्मांमध्ये गौरी पुजनाचे आगळे वेगळे महत्व आहे. या गौरी पुजनांच्या रूढी परंपरेला कंधार येथील माजी जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र येईलवाड यांनी छेद देत आपल्या तिनही सुनांना लक्ष्मीचे रूप मानत त्यांचे गौरी पुजनाच्या दिवशी विधीवत पूजा केली खणा नारळांनी ओटी भरत त्यांची सर्व कुटुंबाने मिळून पूजा करून तीन ही सुनांचे दर्शन घेतले. या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कंधार शहरातील शहाजी नगर येथे गेल्या तीस वर्षापासुन राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते रामचंद्र येईलवाड हे वास्तव्यास आहेत. त्यांनी अनेक वर्षे शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने, रास्तारोको केले. एक लढवय्या कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे गेल्या दोन वर्षांपासून ते गौरी पुजनाऐवजी सुनांचे सन्मान करीत आहेत या उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. या उपक्रमामध्ये त्यांनी वर्षा सुदर्शन येईलवाड, प्रतिभा शशिकांत येईलवाड, मनीषा राजकुमार येईलवाड यांचा सन्मान करत त्यांचे गौरी पूजन केले. यावेळी कमलाबाई येईलवाड, सुखदेव येईलवाड, माजी सभापती बापूराव पा. गौंड पद्मिनबाई येईलवाड, गंगाधर येईलवाड, विनायक येईलवाड, सुनंदा येईलवाड, अंकुश येईलवाड, सुदर्शन येईलवाड, भास्कर येईलवाड यांची उपस्थिती होती.

**सुनांच माझ्या लेकी :** गेल्या पन्नास वर्षांपासून आमच्या कुटुंबात येईलवाड घराण्यामध्ये एकत्र कुटुंबपद्धती असून कुठलेच मतभेद नाहीत, माझ्या तीन ही सुना मला लेकीप्रमाणे असून त्या अहोरात्र कष्ट घेतात . त्यामुळेच कुटुंबाचा विकास होतो . सासू आणि सुना अशी दरी आमच्या कुटुंबामध्ये कधी निर्माण होणार नाही, माझ्या सुनाच खऱ्या लक्ष्मी आहेत, त्यामुळेच त्यांचा गौरव करत आम्ही दरवर्षी पूजन करतो, असे कमलबाई रामचंद्र येईलवाड ( सासु ) यांनी सांगितले .

# स्वाभिमानीचा दणका, शासनाकडून ऊस निर्यातबंदी आदेश मागे


## शेतकऱ्यांमध्ये उसळली होती तीव्र संतापाची लाट

आधुनिक केसरी न्यूज

निफाड : राज्य शासनाने राज्यातील उसाची कमतरता पाहता राज्यतील ऊस बाहेरच्या राज्यात जाण्यास बंदी घातली होती. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. या निर्णयामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक होती. त्यामुळे आगामी काळात संघर्ष पाहता राज्य सरकारने हा निर्णय मागे घेतला आहे. एक आठवड्यापूर्वी राज्य सरकारने महाराष्ट्रातील ऊस बाहेर जाऊ न देण्याचा आदेश काढला होता. एकीकडे एफ.आर.पी.चे तुकडे करायचे आणि दुसरीकडे परराज्यात जाणारा ऊस आडवायचा हे साखर कारखानदार धार्जीने धोरण राज्य सरकारने अवलंबले होते. या आदेशाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तीव्र विरोध केला. 'आम्हाला जेथे योग्य वाटेल तेथे आम्ही उस नेणार, तुमच्यात हिम्मत असेल तर आमच्या गाड्या अडवून दाखवा' असे खुले आव्हान राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला दिले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने राज्यभर या आदेशाची होळी करत या मुद्द्यावर राज्य सरकारशी दोन हात करायला तयार आहोत असा इशारा दिला. स्वाभीमानी शेतकरी संघटनेचा इशारा व त्यातून भविष्यात होणारा संघर्ष याची धास्ती घेऊन राज्य सरकारने ऊस बंदीचा निर्णय मागे घेतला आहे. सरकारने ऊस बंदीचा निर्णय मागे घेतला असला तरी एकरकमी एफ.आर. पी आणि चारशे रुपये जास्तीचा भाव यावर स्वाभिमानी शेतकरी संघटना सध्या आक्रमक आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रसह संपूर्ण राज्यात यावर्षी ऊस आंदोलन पेटण्याचे चिन्ह दिसत आहे. त्यात राज्य सरकारने ऊस निर्यातबंदीचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले होते. मात्र राजू शेट्टी यांच्या आक्रमक भूमिकेमुळे राज्य सरकारने निर्णय मागे घेतल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

राज्य सरकार व केंद्र सरकार दोघेही शुगर लॉबीला बळी पडतात . सरकारने एफ .आर .पी चे तुकडे, ऊस निर्यात बंदी हे कारखानदारांच्या हिताचे निर्णय घेतांना शेतकऱ्यांचा बळी घेतला . म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने एकरकमी एफ .आर .पी प्रमाणे ऊस निर्यात बंदीच्या निर्णयाला कडाडून विरोध केला व हा निर्णय मागे घेण्यास शासनाला भाग पाडले . हे स्वाभिमानी शेतकरी संघटने बरोबरच शेतकरी एकजुटीचे यश आहे .
**– संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

' सरतेशेवटी कर्णाचा अंत झाला. अहंकार असला की माणसाच्या प्रगतीचे, उद्धाराचे चाक जमिनीत रुतून बसते. त्यातच त्याचा अंत होतो. वासुदेवानंद सरस्वती म्हणतात, ' मोक्ष स्वर्गात वा आकाशात वगैरे नाही. जो अहंकार नष्ट करतो, अशा व्यक्तीच्या अंतरात तो असतो. रावणाला सुद्धा आपल्या शक्तीचा गर्व झाला होता. आपल्याला कोणीच काही करू शकत नाही. आपण वाटेल ते करू शकतो हा अहंकार त्याच्या ठायी होता. त्या अहंकारामुळेच सीतेसारख्या पतिव्रतेला उचलून आणून आपण पाप करतो आहोत याचा विवेक त्याला राहिला नाही. त्याला योग्य तो सल्ला देणाऱ्या मंदोदरी, बिभीषण आदींना त्याने तुच्छ लेखून त्यांचा उपमर्द केला. परिणामी रावणालाही नष्ट व्हावे लागले. अशी खूप उदाहरणे इतिहासात आणि पुराणात आपल्याला सापडतात. म्हणूनच ज्योतीला अहंकाराच्या वाऱ्यापासून जपायचे असते. दिव्यातील तेल संपत येईपर्यंत इतरांना प्रकाश द्यायचा असतो. अस्ताला जाताना सूर्यबिंब जसे लाल असते, तशीच ज्योतही लाल रंगाची होते. सूर्य दिवसभर प्रकाश देऊन कृतार्थ मनाने अस्ताला जातो. इतरांना त्याने जीवन दिलेले असते. आपणही असेच कृतार्थ जीवन जगावे. दिव्यासारखा प्रकाश द्यावा. समईतील जळणाऱ्या वाती मला हा प्रकाशरूपी संदेश देऊन गेल्या. त्या दिव्याच्या प्रकाशामुळे जसे देवघर उजळले होते तसेच माझे अंतरंग ही उजळून निघाले. बा भ बोरकरांच्या ' लावण्यरेखा ' या कवितेत फार सुंदर ओळी आहेत. त्या मानवी जीवनाची कृतार्थता सांगतात. कवी म्हणतो  देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदकेचांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे देखणा देहान्त तो जो सागरी सूर्यास्तसा अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा.



## आनंदी पहाट

## नकारात्मक विचार हेच नैराश्याचे मूळ कारण

आधुनिक केसरी

प्रमाणापेक्षा जास्त विचार करण्याच्या नियमित पद्धतींमुळे चिंता, चिडचिड, पॅनीक अटॅक तसेच कमी भूक, झोपेची अनियमित पद्धत, उच्च रक्तदाब आणि बरेच काही होऊ शकते. जेव्हा स्वतःला समजूतदार ठेवायचे असते तेव्हा भावना महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. काळजी करणे आणि जास्त विचार करणे थांबवण्यासाठी मेंदूला फसवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अनाहूत विचार हे नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर, बायपोलर डिसऑर्डर, अमली पदार्थांचा वापर डिसऑर्डर आणि अगदी बर्नआउट किंवा तीव्र



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ताण यासह इतर मानसिक आजारांचेही लक्षणे दिसून येऊ शकतात. मेंदूतील रसायने गोंधळ निर्माण करणे, विस्मरण होणे आणि लक्ष विचलित करणे तसेच मानसिक स्पष्टतेचा अभाव तयार होणे हे या द्वारे दर्शविले जाते.अनेकदा हे सर्व जास्त काम करणे, झोप न लागणे, तणाव आणि संगणकावर जास्त वेळ घालवणे यामुळे देखील होऊ शकते. नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते. त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो.



आधुनिक केसरी

## संत समागमी | सुखावलो ||

ऐहिक सुखात | नाही समाधान ||
राख अवधान | याचे जीवा ||१||
लटक्या संसारी | लटका व्यापार ||
लाभ हानी सार | उमजेना ||२||
चिंतनात बाधा | संसारी चिंतेची ||
चंचल मनाची | घालमेल ||३||
एकांती बैसोनी | रमता भजनी ||
ब्रह्मानंद मौनी | सापडला ||४||
उमगले सार | एका हरिनामी ||
संत समागमी | सुखावलो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

अभयदां महामायां दुर्गां दुर्गतिनाशिनीम्|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ९३ || अभय देणाऱ्या, महामायेला, दुर्गती नाश करणाऱ्या दुर्गेला, तुला दुर्गा देवीला धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीव न शीव न ईश है, ब्रह्म न पूरण ब्रह्म ।
सृष्टि मुक्ति एक सम रहे, कौन पुरुष यह धर्म
।।२२।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय)
०१/०९/२२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तो सत्पुरुष जीव नाही, शिव नाही किंवा ऐश्वर्यवान इंद्रही नाही. तो ब्रह्म नाही किंवा परब्रह्मही नाही. सृष्टी आणि मुक्तीत एकसमान आपल्या स्वरूपात स्थिर असणारा हा पुरुष कोण आहे ? अर्थात हा कोणत्या पुरुषाचा धर्म आहे, जो सृष्टी आणि मुक्तीत एकसमान राहतो ?




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## स्वामी विवेकानंद

आधुनिक केसरी



यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार १३० वर्षांनंतर ही किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत आपल्या भाषणाची सुरुवात, बंधू आणि भगिनींनो अशी केली.विश्वधर्माची कल्पना मांडून ते थांबले नाहीत तर, वसुधैव कुटूंबकम् हा संदेश उपस्थित समुदाया समोर मांडून विश्वधर्माची संकल्पना किती उदात्त आहे हे पटवून दिले. आजची युवा पिढी तर महिती व तंत्रज्ञान क्षेत्रामुळे सर्वच क्षेत्रात पारंगत आहे. त्यांच्या कार्याच्या क्षमता वाढत अजूनही उंच उंच भरारी घेऊन भारतमातेचे नाव उज्वल करतील यात शंका नाही. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेच्या ऐतिहासिक भाषणाला १३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विश्वबंधुत्वाची ओळख नव्या पिढीला होऊन, देशभक्ती आणि देशाप्रति प्रेम ,आदर आपण सर्वांनी अंगीकरले तर ती खरी राष्ट्रभक्ती ठरेल. त्यासाठी गरज आहे खेड्यापाड्यात व शहरात युवकांनी पुढाकार घेतला तर आपला व समाजाचा उद्धार झाल्याशिवाय रहाणार नाही. पण त्यासाठी गरज आहे सामाजिक बांधिलकीची.यासाठी युवकांनी थोर महात्म्याची चरित्रे वाचली पाहिजेत आपल्या आचरणात आणली पाहिजेत.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम हे रूपापेक्षा व्यापक आहे

आधुनिक केसरी

समजा मी तुम्हाला प्रश्न विचारला की, 'आनंद म्हणजे काय ?' तर एखाद्या आनंदी मुलाकडे बोट दाखवून तुम्ही म्हणाल की, 'हे पहा, इथे आनंद आहे !' इतकेच नव्हे तर याप्रमाणे आनंदाने खेळणारी मांजराची पिले, उड्या मारणारी लहान वासरे, हसणारे स्त्री-पुरुष, फुलांनी बहरलेल्या लता, यांच्याकडे बोट दाखवून, 'इथे आनंद आहे' असे तुम्ही सांगाल. पण हे काही माझ्या प्रश्नाचे खरे उत्तर नव्हे. 'आनंदी वस्तू कोणत्या आहेत, असा माझा प्रश्न नसून 'आनंद मला दाखवा असे मी विचारले होते. आनंदी वस्तूमध्ये आनंद राहतो, म्हणून वस्तू हा काही आनंद नव्हे. लहान मूल हेच जर आनंद असेल तर मोठे स्त्री-पुरुष आणि मांजरीची पिले आनंदयुक्त असणार नाहीत. अर्थात् आनंद हा एकच असला पाहिजे; कारण सर्व ठिकाणी आढळणाऱ्या आनंदाला एकच शब्द आपण वापरतो. आपण जो जो माणूस पाहतो, तो तो निराळा असतो, तरी सर्वांना आपण माणसेच म्हणतो, कारण प्रत्येक माणसामध्ये 'मनुष्यपणा' आहे. तो आपल्या इंद्रियांना दिसत नसला तरी मनाने ओळखता येतो, आणि त्याचे अस्तित्व 'मनुष्य' या शब्दाने सांगता येते. 'मनुष्यपणा' हा शब्द आहे, हे नाव आहे, म्हणून रूपाला अस्तित्व नामामुळेच आहे. प्रत्येक वस्तूचे बाह्यरूप तिच्या नामामुळे टिकते. आनंदी वस्तू अनेक असल्या तरी त्यांच्यामध्ये राहणारा 'आनंद' एकच असतो. म्हणजे एकच नव्हे, तर अनेक रूपे आली आणि गेली, तरी नाम आपले शिल्लक राहते. आजपर्यंत या पृथ्वीच्या पाठीवर अगणित स्त्री-पुरुष जन्माला आले, जगले आणि मृत्यु पावले, तरी 'मनुष्यपणा' आहे तसाच आहे. हा नियम सर्वत्र लावला तर असे दिसेल की, चांगल्या वस्तू आल्या आणि गेल्या, पण 'चांगलेपणा' कायम आहे. सुंदर वस्तू आल्या आणि गेल्या, पण 'सौंदर्य' कायम आहे. आनंदी वस्तु आल्या आणि गेल्या, पण 'आनंद' कायम आहे. लाखो जीव आले आणि गेले, पण 'जीवन' कायम आहे. रूपे अनेक असली तरी नाम एकच असते. म्हणजे नाम हे अनेकांत एकत्वाने राहणारे असते. याचा अर्थ असा की, नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते. नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देश-काल निमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. म्हणून नाम हे पूर्वी होते, आज आहे, आणि पुढेही तसेच राहील. नाम हे सत्स्वरूप आहे. नामातून अनेक रूपे उत्पन्न होतात, आणि अखेर त्याच्यामध्येच ती लीन होतात. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी जवळ कोणी असेल तर ते फक्त नामच होय. म्हणून नाम घेतल्यावर भगवंत आपल्याजवळ असल्यासारखाच आहे.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

त्याला देह नसला, तरी तो नाही असे समजू नका. तुम्ही दुश्चित्त झाला म्हणजे तो दुश्चित्त होतो. म्हणून तुम्ही केव्हांही दुश्चित्त होऊ नका. ज्याने जगाची आस टाकली त्याचे तेज पडणारच हे लक्षात ठेवावे. एखाद्या दारू बाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वतःला तो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्ती शिवाय सर्व काही वाया आहे. संता जवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरू सेवा हे एक मुख्य साधन आहे.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

म्हणती धालों धणीवरी ।आतां न लगे शिदोरी ।नये क्षणभरी ।आतां यासि विसंबों ॥१॥चाल चाल रे कान्होबा ।खेळ मांडूं रानीं ।बैसवूं गोठणीं ।गाई जमा करूनि ॥ध्रु.॥न लगे जावें घरा ।चुकलिया येरझारा ।सज्जन सोयरा ।मायबाप तूं आम्हां ॥२॥ तुका म्हणे धालें पोट ।आतां कशाचा बोभाट ।पाहाणें ते वाट ।मागें पुढें राहिली ॥३॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २३ सप्टेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING www.rajasthanimultistate.in Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा * नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


## रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा : डॉ. जीवन राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सर्वसामान्य कुटुंबातून रुग्णसेवेच्या व्यवसायात आल्यामुळे सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सहज लक्षात येतात. ग्रामीण भागातील रुग्ण जेव्हा शहरात येतात तेव्हा त्यांच्या अनेक अडचणी असतात, मी स्वत ग्रामीण भागातून आल्यामुळे त्यांच्या या अडचणींचा एक डॉक्टर म्हणून नव्हेतर कुटुंबातील सदस्य म्हणून निवारण्यावर प्राधान्य देतो. आपल्या भारतीय संस्कृतीत डॉक्टरला देवाचा दर्जा दिला जातो पण मी रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन सतत कार्य करत असतो, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरातील प्रसिद्ध न्युरो सर्जन डॉ. जीवन राजपूत यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी छत्रपती संभाजीनगरातील जेजे प्लस हॉस्पिटलचे संचालक, प्रसिद्ध न्युरो सर्जन



डॉ. जीवन राजपूत बोलत होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना डॉ. जीवन राजपूत म्हणाले की, नुकतेच अत्याधुनिक सुविधांसह दीडशे बेड, 52 आयसू बेड, 15 एनआयसीयू बेड, 13 पीयूसी बेडच्या हॉस्पिटलचा शुभारंभ अदालत रोडवर करण्यात आला आहे. या विस्तारामध्ये आमच्या सर्व रुग्णांचा, हितचिंतकांचा सिंहाचा वाटा आहे. रुग्णाला सर्व सुविधा अतिशय अल्पदरात कशा उपलब्ध होतील यावर कायम आमचा भर असतो. महाराष्ट्रातील लाखो रुग्णांची सेवा करण्याचे सामर्थ्य श्री गणेशाने द्यावे, असे साकडे शेवटी डॉ. जीवन राजपूत यांनी घातले. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, पत्रकार जगदिश कस्तुरे, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.




## शहर सुरक्षेत सर्वांचे योगदान गरजेचे : लोहिया

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ऐतहासिक छत्रपती संभाजीनगर शहराला शांततेची गौरवशाली परंपरा आहे. औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने वाढणाऱ्या या शहरात देशभरातील कामगार वास्तव्य करतात. त्यामुळे शहरातील आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात असून वेगाने होत आहे. शहर सुरक्षेसाठी आमची पोलिस यंत्रणा डोळ्यात तेल घालून कार्यरत असते. नागरिकांनीही शहर सुरक्षेसाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी छत्रपती संभाजीनगरीचे पोलिस आयुक्त मनोज लोहिया बोलत होते. यावेळी पुढे बोलताना पोलिस आयुक्त म्हणाले की, यापूर्वी मी या शहरात काम केल्यामुळे शहराची खडानखडा माहिती आहे. गुन्हेगारीची प्रमाण कमी करण्यासाठी व शांतता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही सोशल मीडिया व प्रसिद्धी माध्यमांचा जो वापर करीत आहोत त्यात चांगले यश येत आहे, असेही शेवटी पोलिस आयुक्त मनोज लोहिया म्हणाले. यावेळी जवाहनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे, पुंडलिकनगर पोलिस ठाण्याच्या निरीक्षक जयश्री आडे व पत्रकार, पोलिस कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## चिमुकल्यांनी चक्क रद्दीपासून साकारला 'इकोफ्रेंडली' गणपती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पर्यावरणाविषयी सारेच जागरुक होत आहेत, पण चिमुकल्यांना ही जाणीव जरा अधिकच. यंदाच्या गणेशोत्सवात वर्तमानपत्र, थोडी शुद्ध माती आणि नैसर्गिक रंगांतून त्यांनी गणेशाची मूर्ती साकारली. विदर्भ आदिवासी विद्यार्थी वसतिगृह लक्ष्मीनगर नागपूर व पितळे शास्त्री हायस्कूल प्रांगणात मुख्याध्यापक अनंत नानोटी, पराग सोनट्टके व वसतिगृह अधीक्षक दिनेश शेराम यांच्या मार्गदर्शनात वसतिगृहाचा माजी विद्यार्थी विक्की अंबाडरे, ईशांत बोपचे याने वर्तमानपत्र व नैसर्गिक रंगापासून तयार केलेल्या 'इको फ्रेंडली' गणपतीची स्थापना करण्यात आली.

## वंचित बहुजन आघाडी भोकर तालुकाध्यक्षपदी दिलीप राव

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर तालुका वंचित बहूजन आघाडीचा अध्यक्षपदी येथील



आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते दिलीप केरबा राव यांची निवड करण्यात आली आहे. आगामी काळात होणाऱ्या निवणुका तोंडावर आल्या असताना पक्षाला अभिप्रेत असणारी संघटना बांधणीसाठी वंचीत बहुजन आघाडीच्या भोकर तालुकाध्यक्ष पदी कोणाची निवड होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून होते.वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या स्वाक्षरीने तालुक्याची नूतन कार्यकारणी जाहिर करण्यात आली. भोकर तालुकाध्यक्ष पदी दिलीप केरबा राव यांची निवड करण्यात आली.वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांच्या आदेशावरून भोकर तालुका जिल्हा नांदेड उत्तरचा विस्तार करण्यासाठी काही दिवसांपूर्वी भोकर येथील शासकिय विश्रामगृहात बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर हत्तीअंभिरे पालमकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली नूतन कार्यकारणी निवड प्रक्रियेच्या अनुषंगाने तालुक्यांतील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. वंचीतच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या स्वाक्षरीने भोकर तालुक्याची नूतन कार्यकारणी जाहिर करण्यात आली.तालुका अध्यक्ष दिलीप केरबाजी राव ,तालुका महासचिव व्यंकट वाडेकर, उपाध्यक्ष ग्यानु चव्हाण, साईनाथ हामंद, आनंद गोलेवाड, आनंदराव एडके, शिवाजी जंपलवाड, माणिक जाधव, सत्यपाल कदम, सहसचिव लखन देवकर, हर्षवर्धन धोतरे, राजेश्वर बोराटे, प्रसिद्धी प्रमुख,दिलीप आंपलवाड, शिवाजी सूर्यवंशी, सुभाष तेले,सल्लागार सटवाजी गायकवाड, सदस्य अक्षय खंदाडे , पुंडलिक कांबळे, किरण ढगारे, प्रवीण चंदेवाड, रवी दुधारे, गोविंद गोलेवाड, शेख आशमाख, विठ्ठल चव्हाण, राहुल देवके, मेहमूद शेख याची निवड करण्यात आली आहे. श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी माझी वंचित बहुजन आघाडी या राष्ट्रीय पक्षाच्या भोकर तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्या खांद्यावर दिल्यामुळे मी पक्षाशी प्रमाणीक व एकनिष्ठ राहून तालुक्यातील वंचित समाजाशी प्रामाणिक राहून वंचित समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी या पदाचा उपयोग करेन, असे तालुकाध्यक्ष दिलीप राव म्हणाले.

## आगामी काळात बसपाच सत्तास्थानी असेल

### मनीष कावळे : भोकरला आरक्षण हक्क परिषदेस प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीच्या तयारीसाठी समर्पणाची गरज आहे. कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकते आहे.येणा-या काळात बसापाच सत्तास्थानी असेल असा विश्वास बसपाचे प्रभारी मनीष कावळे यांनी बुधवारी (ता. २०) व्यक्त केला आहे. शहरातील संगम सभागृहात आरक्षण हक्क परिषद व समिक्षा बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. विचारमंचावर राष्ट्रीय समन्वयक नितिन सींग, प्रदेश अध्यक्ष ॲड. संदीप ताजणे, प्रदेश महासचिव दिगंबर ढोले, परमेश्वर गोणारे, प्राध्यापक आनंद भालेराव, दिलीप देशमुख, कैलास कानिंदे,लक्ष्मण वायवळे, साहेबराव डाकोरे सौ.वंदना गव्हाणे, पंचशीला जाधव, सुनील डोंगरे, बळीराम निखाते, गणेश




राऊत, सखाराम ईगोंले, निखील हंकारे, सतीष भवरे, साहेबराव येरेकार यांची उपस्थिती होती. कावळे म्हणाले की, बसपा हा राष्ट्रीय पक्ष असून मायावती याचे हात बळकट करण्यासाठी आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत कार्यकत्यांनी एकसंघ होऊन लढा देण गरजेचे आहे, असे सांगितले. सूत्रसंचालन पत्रकार तथा तालुका प्रभारी सतीश भवरे यांनी केले. आभार डॉ. कैलास कानिंदे यांनी मानले. कार्यक्रमास बहूसंख्य नागरीकाची ऊपस्थिती होती.

## जिंतूर येथे पुन्हा एकाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील बस स्थानक समोर आज 21 सप्टेंबर सकाळी दहाच्या सुमारे एका 34 वर्षे पुरूष जातीचा मृतदेह आढळून आल्याची घटना घडली असून या परिसरात मृत्युदय आढळून आल्याची ही एका महिन्याची दुसरी घटना असून हे मृत व्यक्ती सातारा जिल्ह्याच्या असल्याच्या समजते यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी पांडुरंग गोपने, प्रशिक्षित उपविभागीय अधिकारी प्राची कर्णे तसेच गुन्हा अधिवेशन शाखाचे पोलीस निरीक्षक वसंत चव्हाण, राम पौळ, नामदेव दुबे, चाटे आदी घटनास्थळी दाखल झाले होते.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील बस स्थानक परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात झाडी झुडपे झालेले आहे या झाडीझुडपामध्ये आज सकाळी दहाच्या सुमारास लघवी करणाऱ्या प्रवाशांस मृत्यु दिसून आला त्यांनीही घटना एसटी कर्मचारी भांबळे यांना सांगितली त्यांनी तात्काळ पोलिसांना संपर्क साधला यात पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे पूर्ण पोलीस ताफासह घटनास्थळी दाखल झाले आणि मयताच्या पंचनामा केला श्वान पथक ,फिंगरप्रिंट एक्सपर्ट बोलविण्यात आले पोलीस सूत्राकडून मिळालेली माहितीनुसार हे व्यक्ती सातारा जिल्ह्यातील असून हे अज्ञात व्यक्ती वाघझडी तालुका पाटण असल्याचा पोलिसांकडून सांगितण्यात आले या मयत व्यक्तीच्या पंचनामा करून पोलिसांनी शव ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे पाठविला यात याचा अज्ञात व्यक्तीने खून केल्याचं समजते पुढील तपास पोलीस करत आहे आणि गुन्हा नोंदण्याची प्रक्रिया सुरू असून मयत व्यक्तीचे नातेवाईकाला कळविण्यात आले असल्याचा पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले.

# स्टॅलिन यांना दणका

आधुनिक केसरी

सनातन धर्माची डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांशी तुलना करणारे तमिळनाडूचे युवक कल्याणमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांच्यासमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. सनातन धर्माबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी त्यांना सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे. उदयनिधी यांच्यासह सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकार, द्रमुख खासदार ए. राजा. सीबीआय आणि इतर काही लोकांना नोटीस बजावली आहे. उदयनिधी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याच्या याचिकेनंतर सर्वोच्च न्यायालयाने या नोटिसा पाठवल्या आहेत. न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस आणि बेला एम. त्रिवेदी यांच्या खंडपीठाने बी. जगन्नाथ यांनी दाखल केलेल्या याचिकेला उत्तर देताना या नोटिसा बजावल्या आहेत. चिथावणीखोर भाषण केल्याप्रकरणी उदयनिधींविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी बी. जगन्नाथ यांनी याचिकेद्वारे केली होती. सर्वोच्च न्याालयाने नोटीस बजावली असली तरी त्यामध्ये उदयनिधींच्या वक्तव्याला चिथावणीखोर वक्तव्य म्हटलेले नाही. स्टॅलिन यांच्याविरोधातील याचिंकांची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने या नोटिसा बजावल्या आहेत. उदयनिधींविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी या याचिकांमध्ये करण्यात आली आहे. सनातन धर्माबाबत उदयनिधींच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांच्यावर भाजपासह देशभरातील हिंदुत्ववादी संघटनांनी जोरदार टीका केली होती. तसेच त्यांच्याविरोधात कारवाईची मागणी केली होती. मिळनाडूचे युवक कल्याण मंत्री उदयनिधी स्टॅलिन हे २ सप्टेंबर रोजी चेन्नई येथे प्रोग्रेसिव्ह रायटर्स अँड आर्टिस्ट असोसिएशनने आयोजित केलेल्या एका सभेला संबोधित करत होते. भाषणादरम्यान, उदयनिधी यांनी समाजातील विषमता आणि सनातन धर्म यावर भाष्य केले. यावेळी त्यांनी सनातन धर्माची मलेरिया, डेंग्यू आणि करोना विषाणूशी तुलना केली. तसेच सनातन धर्माचे उच्चाटन करण्याची भूमिकाही मांडली. उदयनिधी म्हणाले, सनातन धर्म हा समानता आणि सामाजिक न्यायाच्या विरोधात आहे. त्यामुळे अशा गोष्टींना विरोध करण्याऐवजी त्यांचे समूळ उच्चाटन करायला हवे. डास, डेंग्यू, मलेरिया आणि करोनासारख्या आजारांना विरोध करता येऊ शकत नाही. त्यांचे उच्चाटनच करायला हवे. त्याचप्रमाणे सनातन धर्माचेही उच्चाटन व्हायला हवे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# शासन घरी धार्मिक उत्सव नको

आधुनिक केसरी

**भारतात अनेक धर्माचे लोक एकत्र भारतीय म्हणून राहतात. प्रत्येक धर्माला स्वतंत्र असे अस्तित्व असुन प्रत्येक धर्म आपल्याला रुढी, परंपरा, संस्कृतीचे जतन करून धर्माची उपासना करण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाने दिलेला आहे. कायद्या समोर कोणताही धर्म लहान वा कोणताही धर्म मोठा नाही. थोडक्यात भारत हा धर्म निरपेक्ष देश आहे. धर्म ही खाजगी बाब आहे व धर्माचे पालन आपण आपल्या वैयक्तिक जिवनात करू शकतो. सार्वजनिक ठिकाणी किंवा शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माला महत्त्व न देता माणसाला महत्त्व देऊन त्याची भारतीय म्हणून ओळख आहे. परंतु स्वतः ला सुशिक्षित समजणारे आणि शासकीय व निमशासकीय अशा ठिकाणी काम करणारे लोक धार्मिकता आणून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न करतात. हल्ली ते प्रमाण वाढले आहे.**

सत्य व अंधविश्वास, पांखड, थोतांड व वैज्ञानिक बोलले तर येथे लोकांना मिर्ची लागते. परंतु अज्ञानात राहुन अंधविश्वास, पाखंड, असत्य यावर विश्वास ठेऊन बोलले तर त्या व्यक्तीला चांगले माणले जाते. कोणी कोणत्या धर्माचे पालन करावे हा सर्वस्वी वैयक्तिक प्रश्न असताना त्या धार्मिक बाबीला सार्वजनिक किंवा शासकीय निमशासकीय पातळीवर आणणे हे चुकिचे आहे. प्रत्येक धर्मानुसार एखाद्या तरी सन उत्सव किंवा विधी हा उच्च असतो. आणि तो सण उत्सव त्या धर्मातील लोक मोठ्या उत्साहाने साजरे करतात. परंतु जे सन उत्सव घरात साजरे करायचे ते शासकीय निमशासकीय ठिकाणी सुरू केले प्रश्न निर्माण होणार. कारण शासकीय निमशासकीय कार्यालय व संस्था येथे संविधान लागु असते. संविधानाने दिलेली ओळख भारतीय म्हणून आहे. धर्माच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला ओळख दिली नाही. म्हणुन नोकरी करणारे अर्थात बुद्धिमान लोक असतात या लोकांना किमान धार्मिक सन उत्सव शासकीय कार्यालय संस्थेत साजरा करू नये हे ही कळत नसेल तर त्या बुद्धीचा फायदा नेमका आहे तरी काय? प्रत्येक धर्माची विचारधारा वेगळी आहे. काही विचारावर धार्मिक मतभेद आहेत याचाच अर्थ धार्मिक सन उत्सव शासकीय व निमशासकीय कार्यालय व संस्थेमध्ये साजरे झाले तर लोक प्रश्न विचारणारच कारण शासकीय व निमशासकीय संपत्ती ही तेथे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची नसुन जनतेची आहे धर्माची ही नाही. म्हणून धार्मिक विधी शासकीय कार्यालय व संस्थेत साजरा करणे म्हणजे आपल्या धर्मातील चालिरीती जबरदस्ती इतरांवर थोपवने होय. असे कृत्य केल्यानेच धार्मिक टिका टिप्पणी होत असते. एकिकडे गणपती, दहिहंडी, सत्यनारायण, लक्ष्मी पुजन केले जाते. हे फक्त हिंदु धर्मातील काहीच लोक माणतात परंतु जे मानत नाहीत किंवा मुस्लिम ख्रिश्चन, जैन, बौद्ध या धर्मातील लोक वरिल गोष्टींना मान्यता देत नाहीत मग इतर धर्माचे विचार तुडवून आपलाच धर्म लादणे हे चुकीचे आहे. शिकलेल्या व नोकरी करणाऱ्या लोकांना आपण शासकीय ठिकाणी धार्मिक पुजा अर्चा किंवा सन उत्सव साजरे करू नये याने वाद निर्माण होऊ शकतात हेही शासकीय कर्मचारी अधिकारी यांना समजत नसेल तर आपण किती धर्मांध आहोत हे लक्षात येते. शासकीय कार्यालयामध्ये धर्मांधता वाढून कोणत्याही धार्मिक पद्धतीने सन उत्सव किंवा विधीने कोणतेही काम होऊ नये हे तर नैतिकतेचा विषय आहे. परंतु नैतिकता विसरून लोक धार्मिक विधी, सन उत्सव शासकीय कार्यलय किंवा संस्थेत करत होते म्हणून सरकारला पत्रच काढावे लागले. सर्व सामान्य लोकांचे काम करताना शासकीय अधिकारी नियम दाखवतात परंतु धार्मिक सन उत्सव शासकीय निमशासकीय संस्थेत साजरा करताना नियम धाब्यावर बसतात यालाच प्रामाणिक पणा म्हणायचे हा प्रश्न आहे. देवी देवतांचे फोटो शासकीय कार्यालयात लाऊ नये व धार्मिक सण उत्सव साजरे करू नये अशा आशयाचे पत्र सरकारने ने 2002 ला काढल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. त्या पत्राची अंमलबजावणी होत नाही व शासकीय कार्यालयात धार्मीकता वाढून धर्मनिरपेक्षेला तडा जात आहे असे पुन्हा दिसले तेव्हा पुन्हा ४ जानेवारी २०१७ रोजी ग्राम व जलसंधारण विभागाने पत्र काढून देवदेवतांचे फोटो व धार्मिक पद्धतीने पुजा अर्चा, सत्यनारायण सारखी क्रीया करण्यावर बंदी घातली. शासकीय पत्राचा आधार घेऊनच नाशिकचे तत्कालीन आयुष्य व कायद्याचे पालन करणारे अधिकारी म्हणजे तुकाराम मुंढे यांनी नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शासकीय व निमशासकीय कार्यालयात देवी देवतांचे फोटो व धार्मिक विधी करणाऱ्यावंर कार्यवाही केली होती. याचा अर्थ शासकीय अधिकारी कर्मचारी फक्त नियम सर्वसामान्य लोकांना सांगतात स्वतः मात्र त्याचे उलंघन करतात. आणि हे उलंघन केवळ धर्माच्या नावासाठी अंधविश्वास जोपासण्यासाठी असेल तर देशासाठी खुप घातक आहे. शासनाच्या नियमांचे पालन न करता धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे करणाऱ्या लोकांच्या मनात देश व जनता यांच्या साठी आपुलकी नसते हेच सिद्ध होते. धर्म आणि विचारधारा हा खुप मोठा व चर्चेचा विषय आहे. परंतु अनेक लोक म्हणतात केवळ हिंदु धर्मावरच लोक का बोलतात हिंदु धर्मावरच टिका का करतात. तर याचे एकमेव उत्तर आहे धर्म हि खाजगी बाब आहे ती वैयक्तिक पातळीवर वापरणे गरजेचे आहे. शासकीय किंवा सार्वजनिक पातळीवर आणली तर टिका टिप्पणी होणारच. शासकीय ठिकाणी गणेशोत्सव, लक्ष्मी पुजन करणारे लोक इदच्या दिवशी नमाज पठण करतात का? स्वतः चा बाबु आणि दुसऱ्याचं ते कारटं ही मानसिकता मोडीत काढून शासकीय कर्मचारी अधिकारी समजदार व बुद्धिमान असतात हे त्यांनी त्यांच्या वर्तनातुन सिद्ध करावे. शासनाचे पत्र असुनही जर शासनाचे च शासकीय कर्मचारी ऐकत नसतील तर शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्या कडे सर्वसामान्य लोकांनी कोणत्या नजरेमधुन बघावे? सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतील अनेक लोक धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, पाखंड, थोतांड जोपासतात जे विज्ञान व माणुसकी आणि तर्काला धरून नसते. अशा गोष्टी शासकीय पातळीवर होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शासकीय व निमशासकीय ठिकाणी काय करू नये या संदर्भात पत्र काढुनही कर्मचारी व अधिकारी यांना कदाचित पत्रातील मजकूर कळाला नसेल म्हणुन ३१ डिसेंबर २०२१ रोजी सामान्य प्रशासन महाराष्ट्र शासनाने एक पत्र पुन्हा काढले आणि त्यामध्ये यादीच दिली. शासकीय व निमशासकीय कार्यालयात यादीत समाविष्ट असलेलेल्याच गोष्टी तुम्ही शासकीय पातळीवर साजऱ्या करा. त्या यादीमध्ये गणेशोत्सव, दहिहंडी सत्यनारायण लक्ष्मी पुजन असा कोणताही उल्लेख नाही तरीही गणेशोत्सव, दहिहंडी किंवा इतर धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे होत असतील तर हा बदमाश पणा नाही तर काय आहे? शासकीय पातळीवर महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम साजरे करण्याचे आदेश असुनही बऱ्याच शासकीय कर्मचाऱ्यांना महापुरुष हे जातीचे वाटतात. धार्मिक सन उत्सव हे सार्वजनिक वाटतात. महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम सार्वजनिक साजरे व्हायला पाहिजे आणि धार्मिक सन उत्सव हे वैयक्तिक वा खाजगी पातळीवर साजरे होणे गरजचे असून देशातील बरेच शासकीय कर्मचारी मानसिक गुलाम असल्याने सत्याचा स्विकार न करता काल्पनिक बाबींना सत्य मानतात व सत्य बाबींचा स्विकार करत नाहीत. यामुळे देशात धर्मांधता वाढत आहे. शासकीय पातळीवर धार्मिक सन उत्सव साजरा करणे हे कायदेशीर व नैतिक दोन्ही दृष्टीने चुकिचे आहे तरीही साजरे केले जातात. सध्या गणेशोत्सव बहुतांश शासकीय कार्यलय व संस्थेत साजरा केला जातो. परंतु मुस्लिम लोक मुर्तीपुजा मानत नाहीत, बौद्ध लोक नास्तिक आहेत, जैन लोक महाविर यांना तर ख्रिश्चन लोक केवळ येशुला माणतात मग शासकीय ठिकाणी गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे इतर धर्माची मुस्कटदाबी नाही का? मुळात प्रश्न हाच आहे की धर्म कोणताही असो कायद्यासमोर सर्व सारखे आहेत.. आणि कोणत्याही धर्मातील लोकांना पुजा, उपासना करण्याचा अधिकार आहे म्हणून सार्वजनिक ठिकाणी धर्म विषयावरुन वाद होणार नाही म्हणून नैतिक दृष्टीने व शासकीय दृष्टीने आवश्यक आहे. सरकारी कर्मचारी अधिकारी हे जनतेचे सेवक व सरकारचे प्रतिनिधी असतात. म्हणून त्यांनी कार्यालयात वागतानाही सुद्धा कोणत्याही धर्माची प्रत्यक्ष दर्शी ओळख होईल असे वागु नये. कार्यालयीन वेळ संपल्यावर प्रत्येक जन आपल्याला धर्मानुसार काहीही करायला स्वतंत्र आहे. परंतु हे करतानाही सुशिक्षीत असणाऱ्यांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी थोतांड याचा संबध धर्माशी जोडू नये. उठसूट कोणत्याही बाबी धर्माशी जोडून वैचारिक दृष्टीने गुलाम व धार्मिक दृष्टीने अंध बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे तो विषय जरी वेगळा असेल तरीही धार्मिक सन उत्सव कोणत्याही धर्माचे हे शासकीय पातळीवर, शासकीय कार्यालये, संस्था येथे साजरे करणे चुकिचेच आहे. अपेक्षा आहे स्वतः ला सुशिक्षित व समजदार समजणारा नोकरदार वर्ग काही गोष्टी नैतिक व शासकीय पातळीवर समजून घेतील व भविष्यात शासकीय कार्यालय व संस्थेतून धर्मांधता बाहेर पडेल हिच अपेक्षा..



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# गौरी गणपती आगमन क्षण सुखाचा उत्सव आनंदाचा

आधुनिक केसरी

**साला बादाप्रमाणे दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुद्ध पक्षातील अनुराधा नक्षत्रावर साजरा होणारा ज्येष्ठ गौरी(महालक्ष्मी) पुजनाचा उत्सव हा खुप थाटामाटात साजरा होतो .आणि याच दरम्यान गणपती बप्पा यांचं देखिल आगमन आनंद द्विगुणित करणारा ठरतो .गणेश पुजन हि अनादी काळापासून चालत आलेली परंपरा आहे कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्या अगोदर आपण गणेश पुजन करतोच हे वास्तव असुन आपल्या धर्म शास्त्रानुसार गणपती हे पद असुन या पदावर श्री भगवान शंकर यांचे पुत्र गणेश यांना विराजमान होण्याची संधी मिळाली.**

भारतीय संस्कृती ही जगातील सगळ्यात प्रचिन दुरदृष्टी असणारी व सर्व श्रेष्ठ अशी संस्कृती असुन आपल्या संस्कृतीनुसार आपण विविध सण उत्सव साजरे करतो प्रत्येक सण उत्सव यांच धार्मिक अध्यात्मिक महत्व वेगवेगळ असून ही परंपरा यशस्वी पणे पिढ्या न पिढ्या आपण जोपसतोय हेच आपल्या संस्कृतीच महत्वाचा गुण वैशिष्ट्य आहे. अनेक नानाविध गुण वैशिष्ट्याने नटलेली विविधतेत एकतेच प्रदर्शन घडविणारी अनेक सण उत्सवांची खाणं असणारी आपली संस्कृती व परंपरा व त्याचे आपण सगळे आजही अगदी मनोभावे धार्मिक पद्धतीने पालन करून सण उत्सव साजरे करतो व या अविस्मरणीय क्षणात अप्रतिम आनंद जो निर्माण होतो. त्याचे आपण सगळ्यांना भागिदार होण्याचं भाग्य लाभलं हाच आनंद खुप विशाल असतो. एकंदरीत आपले जे सर्व सण उत्सव साजरे करतो. त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आध्यत्मिक महत्व हे वेगवेगळे आहे .पण त्यामधील आनंद मात्र सारखाच आहे. आपल्या संस्कृती नुसार प्रत्येक सण उत्सवांचे स्वरूप व परंपरा हि वेगवेगळी असुन देशाच्या विविध भागात आप आपल्या प्रथेनुसार सर्व जण सण उत्सव साजरे करतात.या सर्व उत्सवाचे अलौकिक असे आध्यत्मिक महत्व आहे. अगदी अनेक वर्षापासून म्हणजे पुरातन काळापासून आपण व आपल्या पिढ्या न पिढ्या हे धार्मिक सण उत्सव अगदी उल्हासा मध्ये सर्व सुख दुःख, भेद, भाव, कटुता,राग, द्वेष, विसरून अगदी आनंदात मग्न होऊन तलिन होऊन साजरे करतो. हेच भारतीय संस्कृतीच महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. एकदा गणपती बाप्पाचे आगमन झाले की मग काय आनंदाला पारावार उरत नाही आणि त्यामध्ये लगेच आगमन होते ते गौराईच आणि मग तर घरो घरी उत्सव काय ती लगबग काय तो आनंद काय तो उत्सव सगळं काही क्षणिक स्वर्ग सुख निर्माण करणारच. भौतिक सजावट किती सुंदर आणि आकर्षक करता येईल. यासाठी अखाडे अराखडे आणि बेत तर अ प्रतिमच आसतात. त्यातही गौराई या लक्ष्मीच्या पावलांनी येतात मग तर सगळं विलक्षणच भन्नाट. गौरीच्या स्वागताला अख्खं कुटुंब लहानथोर अगदी लगबगीने गौराईला आपल्याला घरात आणतात. मग सुरवात होते ती गौराई यांच्या सजावटीची, सजावट, आकर्षक आभूषणे, वेगवेगळे साहित्य आणि धनधान्य राशी, विविध, फळ, गौरवशाली गौराई समोर अगदी विलक्षण दृश्य ,मग गोराईच भोजन व्यवस्था आपल्या कडे साधारणतः तीन दिवस गौराई असतात पहिल्या दिवशी आगमन दुसर्या दिवशी भोजन , आणि तिस-या दिवसी मग आपण गौराईना आनंदाने निरोप देतो . आणि पुढच्या वर्षी येण्याचं निमंत्रण देतो .पहिला दिवस येण्याचा उत्सव दुसरया दिवशी मात्र सकाळी अगदी चाहपाणी नाष्टा, दुपारी अल्पउपहार आणि संध्याकाळी मात्र भव्य दिव्य असा उत्सव म्हणजे भोजन सोहळा सगळ्या पद्धतीनचे मिष्टान्न , आणि वेगवेगळ्या पद्धतीच्या राण भाज्या, ज्यामध्ये पंधरा सोळा प्रकारच्या राण भाज्या समाविष्ट असतात आणि वेगवेगळ्या पद्धतीचे फारळ साहित्य, करून अगदी पुजन करून दीपप्रज्वलन करून गौराईंची पुजा करून पंच पक्वान्न नैवेद्य, दाखवला जातो. दरम्यान गौराई यांच्या डोक्यावर हरळी, आघाडा , याची पेंढी करून डोक्यावर ठेवली जाते. हे हरळी आघाडा अगदी दूर दूर शेतात फिरून शोधून आणावं लागतं आणि मग आरती करून घरातील लहान थोर मंडळी भोजन गृहण करतात. तिसऱ्या दिवशी घरोघरी गौरी पाहण्यासाठी महिलांची झुंबड उडालेली असते . मग अख्खा दिवस आणि मध्यरात्री पर्यंत गौराई दर्शन हा अ प्रतिम सोहळा साजरा केला जातो.आणि मग भक्ती भावाने आरती करून गौराई यांना निरोप दिला जातो. आपल्या संस्कृती नुसार एकता, मानवता, वृद्धिंगत करण्या बरोबरच आनंदी क्षणाची पर्वणी या निमित्ताने आपल्यला मिळते आणि संस्कृती व प्रथा परंपरा ह्या किती मजबूत आहेत याच दर्शन यामधून घडतं. अगदी गरीब, श्रीमंत, लहान थोर प्रत्येकाच्या घरी गौरी गणपती असतात आणि मग प्रत्येक जण आप आपल्या ऐपतीप्रमाणे व्यवस्था करून गौरी गणपती यांचं आदर आतिथ्य करतो. आपल्या संस्कृतीमधील हा विलक्षण आणि आनंदी क्षण असतो. आपण सगळेच दर वर्षी प्रमाणे याही वर्षी वाट पाहत असतो. तो क्षण आलेला आहे आणि प्रत्येकाने या आनंदी पर्वाचा हिस्सा होऊन उत्सवातील आनंद द्विगुणित करयाचा आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गुरुशिवाय उद्धार नाही : प. पू. दर्शरत्नाश्री जी म. सा.

## प. पू. प्रभाकंवर जी मारासाब यांची नववी पुण्यतिथी लोणारात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** माणसाला प्रगती साधायची असल्यास गुरू असणे आवश्यक आहे. गुरु विना जीवनाचा उद्धार होणे अनिवार्य आहे. पूर्वानीक कथामध्येही गुरुला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे असे प्रतिपादन प.पू. दर्शरत्ना श्री जी मारासाहेब यांनी केले. गुरु गणेश मिश्री वर्ल्ड ग्रुप तर्फे धीरज भवनात आज प .पू. प्रभाकर जी महाराज यांची नववी पुण्यतिथी साजरी करताना महाराजांनी विशेष प्रवचना त मार्गदर्शन केले. नुकतेच जैन धर्मियांचे महत्त्वाचे संवत्सरी पर्व संपले. सतत आठ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम, जप, तप आराधना करून जैन बांधवांनी हे पर्व साजरे केले. लोणार शहरात आनंद मंगल भवन येथे प .पू. पुष्पदंता श्री जी महाराज साहेब आधी ठाना 4 व धीरज भवन येथे अजय राखेच्या च्या सानिध्यात संवत्सरी महापर्व साजरा करण्यात आला. या पर्वाचा शेवट दरवर्षीप्रमाणे गुरु मिश्री वर्ल्ड ग्रुप व प्रभा बहू मंडळ यांनी महामंत्राचा जप करून व प .पू. प्रभाकवर जी महाराज साहेब यांची नववी पुण्यतिथी साजरी करूण व सर्वांना क्षमायाचना करुण साजरा केला.

**आमदार डॉ .संजयजी रायमुलकरानी पण केली क्षमा याचना :** शहरात तप साधना केलेल्या ची भव्यदिव्य स्वरूपात गुरुवारी मिरवणुक काढण्यात आली यावेली आमदार डॉक्टर संजय रायमुलकर यांनी भेट देउन जैन बांधव यांना क्षमायाचना करत तपस्या करणार्यची आस्थेने विचारपुस केली सोबतच खासदार प्रतापरावजी जाधव यांनीही जैन बांधवांना क्षमायाचना सांगितली असा संदेश दिला . यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बळीरामजी मापारी, प्रकाशभाऊ मापारी उपस्थित होते .



## गांजा शेतीवर पोलिसांची कारवाई; उपटण्यासाठी मजूरांचा ताफा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** पारध ( ता. भोकरदन ) तालुक्यातील कल्याणी शिवारात गौसखान पठाण याच्या एक एकर शेतातील गांजाच्या शेतीवर पोलिसांनी कारवाई करून कोट्यवधी रुपयांची गांजाची झाडे जप्त केली आहेत. हजारोंच्या संख्येतील ही गांजाची मोठमोठी झाडे-झुडपे उपटण्याच्या कामासाठी पोलिसांनी खासगी मजुरांचा ताफा लावला. कठोरा बाजार येथील शिवारात एक एकर शेतामध्ये गांजाची झाडे लावून शेती केली जात होती.

## धावत्या लोकलमध्ये चढण्याचा प्रयत्न अंगलट

### महिलेचे प्राण वाचल्याने रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे:** कल्याण-कर्जत रेल्वेमार्गावरील विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकात बुधवारी दुपारच्या सुमारास थरारक घटना घडली. पोलिसाच्या तत्परतेमुळे एका महिला प्रवाशाचे प्राण वाचले आहेत.

बुधवारी दुपारच्या सुमारास ही महिला विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकात आपल्या नऊ वर्षाच्या मुलीला घेऊन धावत्या अंबरनाथ लोकलमध्ये चढत होती. मुलगी लोकलच्या डब्यात चढली. तथापी महिलेचा तोल जाऊन ती फलाटावरुन घरंगळत रेल्वे रुळावर जात होती. तेवढ्यात गस्तीवरील असलेल्या ऋषीकेश माने या जीआरपी पोलिसांनी



जीवाची पर्वा न करता क्षणार्धात फलाटाखालून ओढून या महिलेचे प्राण वाचविले. नाजमी सलीम शेख ( वय ३० ) असे लोकलमधून तोल जाऊन पडलेल्या महिलेचे नाव आहे. ही महिला अंबरनाथ पूर्वेतील आंबेडकर नगर भागात राहते. या महिलेची मुलगी लोकल प्रवासात पुढे निघून गेली होती. लोकलमधील प्रवाशांनी या मुलीला धीर दिला. रेल्वे स्टेशनचे मास्तर आणि पोलिसांनी तातडीने विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकात घडल्या प्रकाराची माहिती अंबरनाथ रेल्वे स्थानकातील पोलिसांना दिली. या महिलेला गंभीर दुखापत किंवा अन्य काही इजा झाली नाही. हवालदार आठवले यांनी अंबरनाथ रेल्वे स्थानकात जाऊन मुलीला ताब्यात घेतले. नंतरच्या बदलापूर लोकलने नाजमी शेख अंबरनाथ रेल्वे स्थानकात पोहोचली. मुलीला नाजमीच्या ताब्यात देण्यात आले. ऋषीकेश माने यांच्या तत्परतेमुळे या महिलेचे प्राण वाचल्याने रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यांचे कौतुक केले असून याची कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.




## धर्मवीर संभाजी शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील धर्मवीर संभाजी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित कन्नड संस्थेची 2023 ची 27 वी वार्षिक सभा संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष ताराबाई कृष्णराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली प्रमुख मार्गदर्शन म्हणून सागर कृष्णाराव जाधव उपस्थित होते.

यावेळी पतसंस्थेच्या निवृत्त सभासद श्रीमती चंद्रकला यशवंत राव शिंदे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न झाला. तसेच जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी स्व. कृष्णाराव काशिनाथराव जाधव साहेब यांच्या तैलचित्राचे संचालक मंडळाच्या हस्ते अनावरण करून संस्थेस प्रतिमा भेट देण्यात आली संस्थेचा अहवाल संस्था सचिव प्रदीप सनंसे यांनी अहवाल वाचन केले असता संस्थेच्या सभासदांना सात टक्के प्रमाणे लाभांश वाटप करण्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी 11 लक्ष 12 हजार 815 रुपये लाभांश वाटप करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला . प्रास्ताविक रावसाहेब निकम यांनी केले मार्गदर्शन पर मनोगत संचालक शिवाजी वाघ प्रकाश जिरेमाळी यांनी मनोगत व्यक्त केले सागरजी जाधव साहेब यांनी मार्गदर्शन करताना संस्थेच्या सभासदांचे विमा काढण्याचा संस्थेचा मानस आहे, असे सांगितले अध्यक्षीय समारोप श्रीमती ताराबाई कृष्णाराव जाधव यांनी संस्थेची प्रगती उत्कृष्ट असून सभासदांचा यात मोलाचा वाटा आहे असे सांगितले. सभेसाठी बाळासाहेब निकम, हेमराज खोब्रागडे, उदय जाधव, रावसाहेब निकम, जगन्नाथ जाधव, आजिनाथ जाधव, टीला राठोड, रवींद्र पाटील, चंद्रकांत दापके, संगीता अहिरे, पतसंस्थेचे सर्व सभासद उपस्थित होते आभार रवींद्र पाटील यांनी केले.




महाराष्ट्र Business Katta













# शाळा भाड्याने देणे आहे




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**सरकारी शाळाच्या दैन्यावस्थे विषयी, शिक्षकाच्या अगाध ज्ञाना विषयी अधून मधून बातम्या येत असतात. सरकारी शाळेत ना मंत्र्याची मुलं जातात ना सरकारी अधिकाऱ्याची. त्यासाठी वर्षाला लाखोत् फी वसूल करणाऱ्या हाय फाय कॉन्व्हेन्ट शाळा पायलीच्या पन्नास आहेत! सरकारी शाळेतील विद्यार्थ्यां च्या गुणवत्तेवर देखील प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. म्हणजे पाचवीतल्या मुलाला तिसरीतले गणित न येणे वगैरे.. या शाळांच्या तपासणीचे मनोरंजक किस्से देखील प्रचलित आहेत.नव्या शैक्षणिक धोरणात खरे तर अगदी प्रायमरी पासून सुधारणा सुचविल्या आहेत. गणिताची भीती,इंग्रजी चे भय, मातृभाषेतून शिक्षण असे अनेक विषय म्हणजे न सुटलेले प्रश्न आहेत. शालेय शिक्षणा बाबत प्रत्येक राज्य सरकारची वेगळी भूमिका ही देखील समस्या आहेच.**

त्यातच आता आपल्या सरकारने शाळांसाठी खाजगी कंपन्या, उद्योग संस्था यांच्या पुढे हात पसरून स्वतःची जबाबदारी झटकली आहे. कोटी मध्ये जास्तीत जास्त देणग्या द्या, त्या मोबदल्यात स्वतःची पाटी लावून जाहिरात का, अन् शाळेचा दर्जा, म्हणजेच विद्यार्थ्याची गुणवत्ता सुधारण्याची जबाबदारी तुम्हीच घ्या, असा हा डाव आहे.
खाजगी उद्योग स्वतःचा व्यवसाय सांभाळून ही नवी जबाबदारी का घेतील, कशी पार पाडतील हा मोठा प्रश्न आहे. शिक्षणाचा दर्जा वाढवायचा तर फक्त पैसे देऊन, इमारती बांधून,संगणक देऊन हात झटकले की झाले, असे चालणार नाही.शिक्षकाच्या योग्य, पारदर्शक नियुक्त्या,त्यांना आधुनिक कौशल्य ट्रेनिंग, काळानुसार बदललेल्या शिक्षण पद्धती याचा विचार व्हायला हवा प्रामुख्याने. सरकारने नियुक्त केलेले शिक्षक देणगी देणाऱ्या उद्योजकांचे का ऐकतील? त्यांचा अंकुश का सहन करतील? खरी सुधारणा शिक्षकाच्या हाती आहे. नियुक्त्या करतानाच योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. शिवाय उद्योजक जी कोटीतली देणगी देतील ती योग्य मार्गे योग्य कामासाठीच खर्च होईल यावर नियंत्रण कुणाचे? संगणक खरेदी कोण करणार मिळालेल्या देणगीतून? इमारती सुधारण्याचे, नव्याने बांधण्याचे कंत्राट कोण ठरविणार? यात एरवी होणारा भ्रष्टाचार कसा थांबवणार? याचा काही विचार झालाय का? इथे सरकारी निर्णयातला एक विरोधाभास जनतेच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे. नुकतेच सरकारने विविध देव स्थानासाठी, त्याच्या विकासासाठी हजारो करोड चे बजेट मंजूर केले आहे. देवस्थानाला स्वतःचे उत्पन्नाचे साधन असते.भक्ताकडून येणारे उत्पन्न भरपूर असते. दुसरे म्हणजे तिथला परिसर विकास ही सरकारची प्राथमिकता असू शकत नाही.देवाची पूजा, देवाची भक्ती ही तिथल्या परिसराच्या भव्यतेवर, श्रीमंती वर अवलंबून नसते. देवाची भक्ती ही मनातल्या भावावर अवलंबून असते. संतानी हेच सांगितले आहे. देवस्थानाच्या विकासाचे,ग्रामस्थ,किंवा भक्त बघून घेतील. देवालयाच्या विकासाचे बघण्यास देव समर्थ आहे. सरकारची ती प्राथमिकता असू शकत नाही. जबाबदारी तर नाहीच.उत्तम शालेय शिक्षण,त्यासाठी ची व्यवस्था, उत्तम गुणवान शिक्षकाच्या नियुक्त्या, त्याचे ट्रेनिंग,त्यांना हव्या त्या आधुनिक सुविधा, उत्तम अभ्यासक्रम निर्मिती,आदर्श शिक्षण परीक्षण पद्धती याकडे सरकारने लक्ष द्यावे. मुलासाठी उत्तम आरोग्य सुविधा,पोषण आहार व्यवस्था, वाहतूक व्यवस्था हे सरकारचे काम आहे.देवस्थानाच्या विकासासाठी करोडो देण्याऐवजी ते भेट सरकारी शाळांच्या विकासाकडे, आरोग्य सुविधा कडे वळवावे. आपल्याकडे चांगले मॉडेल्स होते, आहेत. गांधीजींची नयी तालीम, रवींद्रनाथाचे शांतिनिकेतन मधील सहजपाठ, आताच्या काळातील फिनलंड



चे शालेय शिक्षण,युरोप मधील स्वतंत्र विद्यार्थी विकासाची पद्धत जे योग्य वाटेल ते करा. फक्त विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंददायी होईल तेवढे बघा. शिक्षण, अभ्यास, दप्तर, परीक्षा याचे ओझे वाटायला नको. ती सहज सुलभ प्रक्रिया व्हायला हवी. शिकणाऱ्या साठी,अन् शिकविणाऱ्या साठी देखील! शिक्षकाचे वर्क लोड हा शब्दप्रयोग चुकीचा वाटतो. शिकवण्याचे लोड म्हणजे ओझे कसेसेच वाटते ऐकायला. परदेशात शिक्षकांना समाजात खूप मान असतो. निवडीचे निकष देखील कडक, पारदर्शी असतात.शालेय गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप काही करता येईल. त्यासाठी सरकारनेच जबाबदारी घ्यावी. ती उद्योजक, खाजगी संस्था यांच्यावर धकलू नये. सोशल कॉर्पोरेट जबाबदारी म्हणून कुणी आपण होऊन देणग्या दिल्या तर त्याचे स्वागतच आहे. परदेशात गेलेले काही भारतीय आपल्या गावातल्या शाळा साठी मदत करतात. ते स्वागतार्ह म्हणता येईल. पण अशा देणग्या चा उपयोग योग्य वेळेत योग्य कामासाठीच झाला पाहिजे यावर सामाजिक नियंत्रण हवे. तिथेही भ्रष्टाचार नको.
मुलाचा बहुतांश विकास हा शालेय जीवनातच होतो. भाषेवर प्रभुत्व हवे. परदेशात शाळेत चार पाच भाषा शिकवतात. या वयात मुले परक्या भाषा देखील पटकन शिकतात. मातृभाषा तर शाळेत न जाता,व्याकरण न शिकता आत्मसात होते. गणित विज्ञान कृती तून पटकन समजते.यासाठी काही शिक्षक नवनवे प्रयोग करतात. असे चांगले प्रयोग स्थानिक शाळे पुरते मर्यादित न राहता व्हायरल झाले पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाने हे सहज शक्य आहे.मुलांना स्पर्धेपासून अलिप्त ठेवायला हवे.या अशा प्रयोगासाठी आर्थिक मदत घ्यायला हरकत नाही. यासाठी शिक्षण विभागाने शाळां ची गुणवत्ता वाढविण्या साठी काय काय करणे गरजेचे आहे याची बकेट लिस्ट तयार करावी. ती सार्वजनिक करावी. समाजातील कुणीही यासाठी पुढे येऊ शकेल.मतदाराच्या पैशाने गर्भ श्रीमंत झालेले लोक प्रतिनिधी देखील आपापल्या मतदार संघातील शाळांच्या विकासाची प्रामाणिक जबाबदारी घेऊ शकतील. पण कुठल्याही परिस्थितीत सरळसोट एस सी आर च्या नावाखाली खाजगी उद्योगांना शाळा भाड्याने देणे, शाळेत त्याच्या नावाच्या पाट्या लावणे,हा विकासाचा मार्ग असू शकत नाही हे निश्चित !!

# आणि पल्लवीचे प्राण वाचले



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो चार वर्षापूर्वीचा प्रसंग आहे. गावात डेंग्यू तापाची भयंकर साथ आलेली असताना त्यातही गंभीर विषय म्हणजे शाळेकरी मुलं याला जास्त बळी पडले. अमरावती सारख्या शहरात शेकडो मुलं या आजाराने आपला जीव गमावून बसले होते. त्यामुळे डेंग्यू तापाची खूपच दहशत पसरली होती. अशातच माझी मुलगी स्वागता हीला डेंग्यू तापाची लागण झाली. आणि माझी परिस्थिती जेमथेम असल्यामुळे मी तिला सेवाग्राम येथील कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो होतो. सेवाग्राम येथील कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये वार्षिक विमा योजना असल्यामुळे मी गावातील घराघरांमध्ये जाऊन लोकांना वार्षिक विमा काढण्यासाठी आग्रह धरू लागलो होतो. लोकांच्या घरी जाणे.**

त्यांच्याकडून पैसा गोळा करणे. कागदपत्राची लिस्ट तयार करून ती हॉस्पिटलला सादर करणे. आणि त्यांचे विमा कार्ड घरापर्यंत पोहोचून देणे. हे सगळं काम करत असताना फार मोठी रिस्क असते. कारण थोडी फार जरी चूक झाली तरी हेच लोक कार्यकर्त्यावर उलटत असतात. आणि प्रसंगी भांडायला ही तयार होत असतात. हे सगळं निमूटपणे सहन करायचं असतं. आणि तरीसुद्धा आपलं काम पुढे चालूच ठेवायचं असतं. त्यामुळे गावातील जवळ जवळ 40,50 कुटुंबातील लोकांनी आपले विमा कार्ड काढले सुद्धा होते. हा माझा दरवर्षीचा नित्य नेमच झाला होता. शेजारच्या वडगाव राजदी या गावातील रुग्णांनी सुद्धा काही आपले विमा कार्ड माझ्याकडून काढून घेतले होते आणि आजही काढून घेत आहे. त्यामुळे अशा पद्धतीचा आजार झाल्यास लोक हे सेवाग्रामला आपला इलाज करू शकत होते. मी स्वागताला कस्तुरबा हॉस्पिटल मध्ये घेऊन गेलो त्यामुळे गावातील अनेक रुग्णांनी सेवाग्राम येथील कस्तुरबा हॉस्पिटल येथे धाव घेतली होती. मित्रांनो कुठल्याही प्रायव्हेट दवाखान्यामध्ये सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर आपला उपचार करून घेऊ शकत नाही. कारण खर्चाचं प्रमाण इतकं भयंकर असतं की उपचार करण्याऐवजी त्या रुग्णाला मृत्यू पत्करणे सोईचे अशी परिस्थिती आहे. त्यासाठी एकच उदाहरण देईन. माझ्या पत्नीला गर्भाशयाचा कॅन्सर झाल्यामुळे खूप त्रास व्हायचा. मी सर्वप्रथम चांदूरला डॉ.पाटणकर मॅंडम म्हणून नाक कान घसा तज्ञ असणाऱ्या परंतु तरीही स्त्रियांशी संबंधित आजारावर उपचार करणाऱ्या दुसऱ्या स्त्री रोग तज्ञ नसल्यामुळे पेशंट त्यांच्याकडेच गर्दी करायचे त्यांच्याकडे घेवून गेलो तेव्हा त्यांनी तपासणी केल्यानंतर गर्भाशयामध्ये सूज असल्याचे सांगितले आणि अमरावती येथील मोनाली ढोले यांच्याकडे तुम्ही घेऊन जा असा सल्ला दिला अर्थातच त्यांचे त्यांच्याशी हितसंबंध होते.

अमरावतीला गेलो असता त्या डॉक्टर हजरच नव्हत्या. दुसऱ्याच डॉक्टरानी सोनोग्राफी केली आणि मोनाली ढोले यांच्याशी संपर्क केला. गर्भाशयामध्ये प्रचंड मोठा कॅन्सरचा गोळा आहे ऑपरेशन करावं लागेल मी पंधरा दिवसांनी चांदुर रेल्वे ला येईल तेव्हाच संबंधित रुग्णांना सोनोग्राफीचा रिपोर्ट देईल तोपर्यंत त्यांना नॉर्मल सांगून घरी पाठवा. अशी चर्चा त्यांची झाली कारण मोनाली ढोले या माउंट अबू ला गेल्या होत्या. चाळीस-पन्नास हजार रुपये कमाईचा पेशंट हा एकाएकी जाऊ द्यायचा नाही त्यामुळे आम्हाला थोडीफार सूज आहे मॅडम चांदूर रेल्वेला येईल तेव्हा तुम्हाला सोनोग्राफी चा रिपोर्ट दाखवण्यात येईल असे सांगून घरी पाठविले. आम्हाला वाटलं सगळं नॉर्मल आहे. आणि आम्ही घरी गेलो. पंधरा दिवसांनी गेल्यानंतर सोनोग्राफीचा रिपोर्ट हातात घेताच गर्भाशयामध्ये प्रचंड मोठा गोळा असून तुम्हाला ताबडतोब ऑपरेशन करावं लागेल आणि खर्च आमच्यासमोर ठेवला. मी त्यांना ताबडतोब मला रिपोर्ट द्या मी तुमच्या हॉस्पिटलमध्ये उपचार करून घेऊ शकत नाही अशे सांगितले आणि कस्तुरबा हॉस्पिटल येथे पुढचा उपचारासाठी गेलो मोफत शस्त्रक्रिया आणि किमोथेरपी करून घेतली. आज तेरा वर्षे झाले माझी पत्नी ही अगदी ठणठणीत आहे. वरील प्रसंगावरून डॉक्टर हे सर्व सामान्य गोरगरीब कष्टकरी कामकरी जनसामान्यांचे रक्त शोषण करणारे ढेकूण आहे. असंच म्हणावं लागेल. अशा स्थितीमध्ये जिवंत राहायचं असेल तर कुठल्याही गव्हर्मेंट हॉस्पिटलमध्ये गरिबांना आपला उपचार करून घेणे हा एकच पर्याय आहे. नाहीतर मृत्यू अटळ स्वागतावर डेंग्यू तापासाठी उपचार घेत असताना गावातील सोहम अशोकराव टाले, प्रतीक्षा खुशाल टाले, आणि पल्लवी राजेंद्र टाले, हे रुग्ण सुद्धा याच तापावर उपचार घेण्यासाठी



सेवाग्राम ला कस्तुरबा हॉस्पिटल मध्ये दाखल झाले होते. त्यामध्ये पल्लवी ही एकाएकी गंभीर झाली. पल्लवी आणि रेणू ह्या दोघ्या बहिणी त्यात पल्लवी अत्यंत हुशार बीएससी केल्यानंतर तिने DEPLOMA IN PHARMACY केला तिचे वडील राजेंद्र टाले हे सर्वसामान्य शेतकरी शेतावर गेले असतानाच आईने पल्लवीला जवळ थोडेसेच पैसे घेऊन कस्तुरबा हॉस्पिटल गाठले होते. त्यामुळे त्यांच्याकडे अगदी थोडेच पैसे होते. डेंग्यू हा हाडं मोडणारा ताप आहे. अशा मध्ये रुग्णांना प्रचंड अंग दुखी असते. अशक्तपणा असतो. पल्लवीच्या रक्तातील प्लेटलेट्स हे झपाट्याने कमी झाल्यामुळे तिला बाहेरून प्लेटलेट्स पुरवावे लागतील आणि त्या तुम्ही आज सायंकाळी ताबडतोब घेऊन या आठ दहा हजार खर्च येईल. असे डॉक्टरांनी सांगितले. पल्लवी सुस्त पडली होती.


वडील सोबत नाही. जवळ पैसा नाही. रात्रीची वेळ. त्यामुळे पल्लवीची आई घाबरलेली होती. मी त्यांना धीर दिला आणि तुम्ही काही काळजी करू नका मी व्यवस्था करतो असे आश्वासन दिले आणि वर्धा येथील माझे सहकारी मित्र अक्षय दादा कदम आणि त्यांचे वडील प्रकाश दादा कदम यांच्याशी संपर्क करून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकार आमचे मार्गदर्शक आदरणीय भाऊसाहेब थुटे यांच्याकडून मला ताबडतोब दहा हजार रुपये द्या मी तुम्हाला परत करीन अशी विनवणी केली. लगेच प्रकाश दादा आणि अक्षय यांनी साहेबांशी संपर्क केला आणि साहेबांनी ताबडतोब दहा हजार रुपये अक्षयच्या हातावर दिले. तोपर्यंत मी सेवाग्राम इथून वर्धेच्या एसटी डेपो मध्ये येऊन पोहोचलो. अक्षयने दहा हजार रुपये मला दिले आणि मी नागपूरसाठी निघालो. सायंकाळी 11 वाजता नागपूर येथील एका विशिष्ट ब्लड बँक मध्ये जाऊन प्लेटलेट्स घेतल्या आणि सायंकाळी उशिरापर्यंत वर्धा येथे पोचलो. तिथून कसतरी कस्तुरबा हॉस्पिटल गाठलं डॉक्टरांनी प्लेटलेट्स ताबडतोब पल्लवीला दिल्यामुळे पल्लवीचे प्राण वाचले. पल्लवी आता धामणगाव रेल्वे येथे प्रायव्हेट मेडिकल मध्ये प्रॅक्टिस करत आहे चांदुर रेल्वे ला जात असताना तिनेच अचानक हा विषय काढला आणि आठवणी ताज्या झाल्या ती म्हणाली काका तुमच्यामुळे माझे प्राण वाचले मी म्हटलं नाही बेटा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे मानवधर्म श्रेष्ठ सकलाहुन माणुसकीमुळे मानवतेमुळे मानव धर्म सर्वश्रेष्ठ आहे. पल्लवी जरी माझ्या गावातील आणि माझ्या परिवारातील असली तरी तिला दहा हजार रुपये पुरवणारे भाउसाहेब आणि ते अत्यंत जिव्हाळ्याने माझ्यापर्यंत पुरवणारे अक्षय आणि प्रकाश दादा यांचा पल्लवीशी आजपर्यंत कुठलाही संबंध नाही. पण आम्ही सगळे माणुसकीच्या धाग्याने बांधले गेलो होतो. एकवटले गेलो होतो. आज देशाला जो धर्मांधतेचा भयंकर आजार झालेला आहे त्यावर एकमेव उपचार म्हणजे मानवता आणि त्यातून बरे व्हायचे असेल तर त्यासाठी माणुसकीची लस आपण सगळ्यांनी टोचून घेतली पाहिजे. अर्थातच पल्लवीला पुढील वाटचाली खूप खूप शुभेच्छा.

# बिरबलची खिचडी

आधुनिक केसरी

थंडीचे दिवस होते. सम्राट अकबरने एके दिवशी एक घोषणा केली की त्याच्या राजवाडयासमोरच्या जलकुंडात जो कोणी रात्रभर उभा राहिल, त्याला शंभर सुवर्ण मुद्रा देण्यात येतील. हि दवंडी राज्यभर पिटवली गेली. ती दवंडी ऐकून एक गरीब माणूस ते साहस करायला तयार होता. तो माणूस त्या थंडीत रात्रभर जलकुंडात कुडकुडत उभा राहतो. हया थंडीने तो माणूस मरून जाईल असे सेवकाने बिरबलला सांगितले. बिरबल बोलला 'तो डोक्याने मजबूत आहे व यश मिळविण्यासाठी तो तयार आहे.'दुसऱ्या दिवशी सकाळी अकबर येतो तेव्हा तो माणूस आपल्या जागेवर आनंदात उभा असतो. तो माणूस त्या थंड पाण्याच्या जलकुंडातून बाहेर येतो व आपण यशस्वी झालो असे त्याला वाटते. 'तू ही अशक्य गोष्ट कसे काय करू शकला?' राजाने विचारले. 'हे अतिशय अवघड काम होते व ते तू अगदी सहजगत्या शक्य करून दाखविले. माझा यावर विश्वासच बसत नाही.' यामागचे गुपित काय?' 'महाराज हया मागे गुपित असे काहीही नाही. मी फक्त विजयी होण्याचा निर्धार केला होता.' तो गरीब माणूस बोलला. अकबरने विचारले 'तू तुझी पूर्ण रात्र या गार पाण्यात कशी घालवली?' 'मी राजवाडयातील दिव्याकडे बघत होतो.' 'आता लक्षात आले!' अकबर बोलला. 'तर तू तुला लागणारी ऊब माझ्या राजवाडयात रात्रभर चालू असणाऱ्या दिव्यापासून मिळविली त्यामुळे तुला थंड पाण्यात थंडी वाजलीच नाही व तुझी पूर्ण रात्र आरामात गेली. तर याबाबतीत मी तुला काहीही बक्षिस देणार नाही. तू तुझ्या घरी जाऊ शकतोस.'तो गरीब माणूस दुःखी होतो. त्याला वाटते की आता बिरबलच आपल्याला न्याय देईल. तो बिरबलकडे जाऊन संपूर्ण घटना त्याला सांगतो. बिरबल त्याला म्हणतो 'तू घरी जा, मी बघतो काय करायचे ते.' दुसऱ्या दिवशी बिरबल अकबरकडे येतो व म्हणतो की 'मी आता खिचडी तयार करायला शिकत आहे , तरी उदया सकाळी तुम्ही माझ्या घरी खिचडीची चव बघायला या.' बिरबलने जेवणाचे आंमत्रण दिल्यामुळे अकबर खुश झाला. दुसऱ्या दिवशी अकबर बिरबलच्या घरी पोचला. बिरबलने त्याचे स्वागत केले व त्यांना बसविले. बराच काळ गेल्यानंतरही बिरबलच्या घरातून कोणीही राजाला साधे पाणीही दिले नाही. अकबरला खूप भूक व तहान लागली होती. 'बिरबल कूठे आहे?' राजाने विचारले. 'घराच्या बाहेर बागेत.' सेवकाने उत्तर दिले. 'मी तासाभरापूर्वीही हाच प्रश्न विचारला होता , तेव्हाही तू हेच उत्तर दिले होते.' अकबरने विचारले 'तो बागेत काय करत आहे?' सेवक म्हणाला. 'माफी असावी महाराज, तो खिचडी बनवण्यात व्यस्त आहे.' अकबर खूप चिडला व उठून उभा राहिला आणि सेवकावर ओरडला. सेवक म्हणाला , 'जे सत्य आहे मी तेच सांगत आहे.' अकबर दरबाऱ्यांबरोबर बिरबलच्या बागेत गेला. बिरबलने एक छोटीशी चूल पेटवून बऱ्याच उंचावर एका मडक्यात खिचडी शिजवायला ठेवली होती. 'कुठे आहे तुझी खिचडी?' अकबरने विचारले. बिरबलने उंचावर टांगलेल्या मडक्याकडे बोट दाखविले. 'हे काय आहे बिरबल?' तू एवढा हुशार आणि चतुर मग तुला एवढे समजत नाही की खिचडी आणि विस्तवात एवढे अंतर असेल तर मडक्यापर्यंत उष्णता पोहचणार नाही व खिचडी कशी शिजेल?' तेव्हा बिरबल म्हणाला 'क्षमा असावी महाराज दूरच्या दिव्याची ऊब घेऊन एखादा माणूस रात्रभर कडाक्याच्या थंडीत उभा राहू शकतो तर मग याच न्यायाने इतक्या अंतरावरून विस्तवाच्या ऊबेने खिचडी शिजायला काय हरकत आहे?' अकबर बोलला, 'मला आता समजले की तुला काय म्हणायचे आहे. मी त्या गरीब माणसाबरोबर दृष्टपणा केला आहे व मला माझी चूक लक्षात आली आहे. मी तुला वचन देतो की मी त्याला दोनशे सुवर्णमुद्रा देईन.'

# आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता.**

अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था



आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३६ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे.

# लढा धनगर समाज आरक्षणाचा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राज्यात सध्या एकाचवेळी मराठा, कुणबी, ओबीसी, धनगर आरक्षणावरून आंदोलनाची धग पेटली आहे. मराठवाड्यात मराठा-कुणबी, विदर्भात ओबीसी तर उत्तर-पश्चिम महाराष्ट्रात धनगर आरक्षणाची तीव्रता मोठी आहे. नगर जिल्ह्यात चौंडी इथे धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश केला जावा या मागणीसाठी गेल्या पंधरा दिवसांपासून यशवंत सेनेच्या कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १७ दिवस उपोषण केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या उपोषणाची आणि मराठा समाजाच्या आंदोलनाची दखल घेत कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. तसेच, ठोस निर्णय घेण्यासाठी सरकारने एक महिन्याचा कालावधी मागितला. अखेर मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण संपले.**

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, या मागणीसाठी ओबीसी नेत्यांनी संघर्षाचे हत्यार उपसले. दुसरीकडे धनगर समाजाला आरक्षण मिळावे यासाठीही नगरच्या चौंडी येथे उपोषण करण्यात येत आहे. तर, शासनाच्या कंत्राटी भरतीच्या निर्णयाविरोधात राज्यातील तरुणाई रस्त्यावर उतरली आहे.मराठा आरक्षणावरून सरकार कात्रीत सापडलेले असतानाच दुसरीकडे आता धनगर समाज आक्रमक झालेला पाहायला मिळतोय.

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये(एसटी) समावेश करून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी नगर जिल्ह्यातील चौंडी येथे धनगर समाजाचे उपोषण सुरू असून राज्यभर आंदोलन, मोर्चे काढण्यात येत आहेत. त्यामुळे सरकारने धनगर समाजाच्या शिष्टमंडळाशी बोलणीही सुरू केली आहेत. धनगर समाजाला 'एसटी' दर्जा देण्यात आदिवासी समाजाचा तीव्र विरोध आहे. या मुद्दयावर आदिवासी समाजही आक्रमक होण्याची शक्यता आहे. सर्वच समाजघटकांतून आरक्षणाची मागणी वाढू लागली असताना काँग्रेसचे माजी खासदार हुसेन दलवाई यांनी मुस्लीम समाजाच्या आरक्षणाचा निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

नागपुर मधील.संविधान चौकात भव्य ओबीसी मोर्चा काढण्यात आला. डोक्यावर लाल रंगाची पगडी, हातात पिवळा झेंडा आणि दुसऱ्या हातात 'आम्ही ओबीसी आरक्षणाचे रक्षक" असे फलक घेऊन ओबीसी मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, अशा लेखी आश्वासनाची मागणी या मोर्चात करण्यात आली.

धनगर आरक्षणाच्या मागणीचा इतिहास

धनगर समाजाला सध्या NT प्रवर्गातून साडेतीन टक्के आरक्षण आहे. मात्र आम्हाला ST प्रवर्गातून साडेतीन टक्के आरक्षण मिळावे अशी धनगर समाजाची मागणी आहे. 1985-86 साली यशवंत सेनेच्या माध्यमातून श्री. कोकरे यांनी धनगर समाजाला ST मधून धनगर आरक्षणाची मागणी केली. केंद्र सरकारच्या सूचीमध्ये धनगड नावाच्या जातीला ST प्रवर्गातून आरक्षणाची तरतूद आहे. मात्र धनगड आणि धनगर या शब्दावरून सध्या महाराष्ट्रातील धनगर आरक्षण रखडलं आहे. धनगर समाजाच्या मते धनगड आणि धनगर हे एकच असून अधिकाऱ्यांच्या चुकीने आणि शब्दाच्या अपभ्रंश झाल्याने धनगड हे नाव लागलंय. महाराष्ट्रातील 338 तहसील कार्यालयाने पत्र दिलं



की, धनगड जातीचा दाखला आजपर्यंत दिलेला नाही. या पत्राचा आधार घेत धनगड ही जात अस्तित्वात नसल्याचा दावा धनगर समाज करतोय. याबाबत 2015-16 साली महाराणी अहिल्यादेवी प्रबोधन मंच, मुंबई यांच्यातर्फे हाय कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. धनगर आणि धनगड हे एकच आहेत. मात्र हिंदी भाषिक लोकांमुळे त्याचा अपभ्रश झाल्याचा दावा अहिल्यादेवी प्रबोधन मंचने केलाय. मात्र याला विरोध दर्शवत आदिवासी समाजाच्या संघटनेने या मागणी विरोधात कोर्टात धाव घेतली होती. "आपण धनगड आहात का? धनगर असाल तरच तुम्ही याचिका दाखल करू शकता, असे म्हणत हायकोर्टाने त्यांची मागणी फेटाळली. त्यानंतर 2018 साली पंढरपूरमध्ये धनगर समाजाचे उपोषण झाले. त्यावेळी देवेंद्र फडणवीस सरकारने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केले की धनगर आणि धनगड हे एकच आहेत. परंतु त्यानंतर त्याबाबत कोर्टामध्ये सुनावणी झाली नाही. पुढे 2 वर्षे कोरोनामुळे ही केस पेंडिंग पडली. पुन्हा शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर 2 महिन्यापूर्वी याबाबत अंतिम सुनावणी होती. मात्र काही आदिवासी आमदारांच्या दबावामुळे सरकारने या केसमधील सरकार पक्षाचे महाअधिवक्ता यांना बदलले. त्यामुळे ही सुनावणी पुन्हा एकदा अनिश्चित काळासाठी स्थगित झाली. याबाबत पुढील सुनावणीची तारीख काय आहे याबाबत कोणतीही कल्पना दिलेली नाही. धनगर समाजाच्या मते आमची मुळ मागणी ST प्रवर्गात होती. मात्र आम्हाला NT प्रवर्गातून 3.5% आरक्षण दिले. त्यातही NT प्रवर्गातून दिलेल्या आरक्षणात 17 जाती समाविष्ट केल्या. त्यामुळे धनगर समाजाला त्याचा लाभ मिळत नाही. मेंढपाळ समाजाला विविध राज्यात वेगवेगळी नावे आहेत. कर्नाटकासह दक्षिण भारतात कुर्बा म्हणतात तर उत्तर भारतात पाल, बघेल, गडेरिया अशी नावे आहेत. तत्कालीन लोकांनी केलेल्या चुका सुधारत, राज्य सरकारने दोन्ही सभागृहात एकमताने प्रस्ताव मंजूर करून तो प्रस्ताव लोकसभेकडे पाठवावा अशी धनगर समाजाची मागणी आहे.

# सत्यशोधक समाज : शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष

आधुनिक केसरी

**राज्यात सध्या एकाचवेळी मराठा, कुणबी, ओबीसी, धनगर आरक्षणावरून आंदोलनाची धग पेटली आहे. मराठवाड्यात मराठा-कुणबी, विदर्भात ओबीसी तर उत्तर-पश्चिम महाराष्ट्रात धनगर आरक्षणाची तीव्रता मोठी आहे. नगर जिल्ह्यात चौंडी इथे धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश केला जावा या मागणीसाठी गेल्या पंधरा दिवसांपासून यशवंत सेनेच्या कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १७ दिवस उपोषण केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या उपोषणाची आणि मराठा समाजाच्या आंदोलनाची दखल घेत कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. तसेच, ठोस निर्णय घेण्यासाठी सरकारने एक महिन्याचा कालावधी मागितला. अखेर मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण संपले. १८१८ साली पेशवाई अस्तास गेली आणि हिंदुस्थानात ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरु झाला.**

हा काळ म्हणजे सांस्कृतिक दृष्टीने अवनतीचा काळ म्हटला पाहिजे, ब्राम्हण कर्मकांडात बुडाले होते, समाजामध्ये कनिष्ठ जातीच्या लोकांना सामाजिक आणि बौद्धिक जीवनात कोणतीच प्रतिष्ठा नव्हती. वर्ण जातिस्त्रीदास्य व धर्मास प्राप्त झालेले विकृत स्वरूप यामुळे तत्कालीन समाजाची स्थिती दयनीय झाली होती, शोषक आणि शोषित अशा दोन वर्गामध्ये समाजाचे विभाजन झाले होते. १८६० साली भारतीय दंड संहिता अस्तित्वात आल्यानंतर दळणवळणाच्या आधुनिक साधनामुळे लोकांचा परस्परांशी संपर्क वाढला. विचारांची देवाणघेवाण व बदलत्या जगाचा परिचय यामुळे संकुचितपणाची जागा उदारमतवादाने घेतली. आधुनिक शिक्षण पद्धतीने हिंदू - मुस्लिम पारंपरिक, धार्मिक, शिक्षणसंस्था मागे पडल्या इतिहास, गणित, भूगोल, सृष्टीविज्ञान अशा आधुनिक विद्याशाखांनी धार्मिक विद्यांचे स्थान घेतले. शब्दप्रामाण्यवर आधारित कोणतीही जुनी धर्मसंस्था समाजाचा विकास खुंटवणारी आहे, हे नवशिक्षितांच्या लक्षात आले, त्यातून धर्मचिकित्सा सुरु झाली, यालाच ब्रिटिश राजवटीतला प्रबोधनाचा काळ असे म्हणतात, या काळात उदारमतवादी ब्रिटिश सत्तेच्या आगमनामुळे व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संपर्कामुळे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात अनेक प्रकारच्या गोष्टींच्या चर्चा सुरू झाल्या, विशेषतः हिंदू धर्मातील कालबाह्य रूढी परंपरेबद्दल व पुरोहित शाहीच्या वर्चस्वाबद्दल, अमानुष जातीप्रथेबद्दल, स्त्रियांच्या दयनीय स्थितीविषयी लिहिणाऱ्यांची संख्या वाढली. उलटसुलट चर्चा सुरू झाली होती.आपल्या समाजात प्राचीन काळापासून धार्मिक आणि सामाजिक जीवनाच्या व्यवच्छेदक सीमारेषा कधीही स्पष्ट झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे प्रत्येक सामाजिक प्रश्नाचा कोठे ना कोठे धर्माशी संबंध आलेला आहे. प्रथम सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य हा वाद एकोणिसाव्या-विसाव्या शतकात निर्माण झाला होता लोकहितवादी, महात्मा फुले, न्या रानडे, गोपाळ गणेश आगरकर यांच्याप्रमाणेच मुकुंदराव पाटील यांनी सामाजिक सुधारणेचा पक्ष घेतला. देशाच्या स्वातंत्र्याची कळकळ असणे योग्य असले तरी समाजाच्या अधोगतीकडे दुर्लक्ष करून देशाची उन्नती होणे अशक्य आहे . सर्व समाजात शांतता, समता आणि ममता यांचा प्रसार करून सर्व मागासलेल्या वर्गाची विद्यादेवीच्या मंदिरात परस्परांशी ओळख पटविणे, देशबंधुत्व अनुभवास आणून देणे ही देशोन्नतीची अंगे आहेत असे त्यांना वाटत होते तत्कालीन राजकीय चळवळ आणि बहुजन समाजाची समाजोन्नती या परस्पराहून भिन्न असल्याने ही राजकीय चळवळ मागासलेल्या व उपेक्षित वर्गाच्या उन्नतीस मारक आहे त्यामुळे बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी सामाजिक सुधारणाच महत्वाच्या आहेत असा विचार त्यांनी व्यक्त केला. इंग्रजांच्या अमलांत विशेषतः बंगाल प्रांतात बदलाचे वारे वाहू लागले होते, महाराष्ट्रात सुद्धा ते लवकरच पोहोचले. महाराष्ट्रातील बुद्धिप्रामाण्यवादी, सुधारणावादी, शिक्षित वर्गाने ब्रिटिश राजवटीतील सुधारणांचा स्वीकार आनंदाने केला. या मंडळींनी वैयक्तिक प्रयत्नांबरोबरच संघटनात्मक प्रयत्ननांवर देखील विशेष जोर दिला. उच्च शिक्षित अत्यंत बुद्धिमान व समाजोद्धाराची तळमळ असणाऱ्या समाजसुधारकांनी प्रबोधनाचा लढा सुरू केला, आर्य समाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज यांची भूमिका मात्र वेगळी म्हणजे वेद हे ईश्वरनिर्मित आहेत अशी त्यांची श्रद्धा होती. या तीन समाजाचे संस्थापक वरिष्ठ ब्राम्हण जातीतील होते, आध्यात्मिक समतेसाठी त्यांचे प्रयत्न होते परंतु त्यांचा सर्वसामान्य जनतेशी फारसा संबंध नव्हता, या तीन समाजाच्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाने खेड्यापाड्यातील जनसामान्यांच्या मनात स्थान मिळविले, तसेच त्यांच्या जाणिवांना, आकांक्षाना आधुनिक भारताच्या जडणघडणीत जोतिबा फुले यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, परमहंस सभा, मानवधर्म सभा, यांच्याप्रमाणे सत्यशोधक समाजाचे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री पंडित, महात्मा फुले यांनी माणसाला साध्य मानले आणि व्यक्तिवाद, विवेकवाद, इहवाद या आधारभूत तत्त्वावर स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, ्याय, सहिष्णुता या मूल्यांवर आधारित नवसमाजरचना निर्माण करण्यासाठी प्रबोधन केले. साहित्य, नियतकालिके, कृतीकार्यक्रम इत्यादींच्या माध्यमातून प्रबोधनाचा विचार सर्वदूर पोहोचविण्याचा प्रयत्न केला. क्रमशः

- रवींद्र मालुसरे
अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, ९३२३११७७०४

# रवींद्र टोंगे यांची प्रकृती चिंताजनक

## जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करू नये, बिहारच्या धर्तीवर जातनिहाय सर्वेक्षण करण्यात यावे, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृह असावे या मागण्या घेऊन अन्नत्याग आंदोलन करणारे ओबीसी विद्यार्थी संघटना जिल्हा अध्यक्ष रविंद्र टोंगे यांची आज 12 व्या दिवशी प्रकृती चिंताजनक झाली असून त्यांना आज डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रविंद्र टोंगे यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले असले तरी आमचे आंदोलन हे पुढेही असेच सुरु राहील असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने आज सांगण्यात आले.

गेल्या बारा दिवसांपासून रविंद्र टोंगे हे अन्नत्याग आंदोलनाला बसले होते . आज सकाळपासून त्यांची प्रकृती चिंताजनक जाणवू लागल्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना आज जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले असले तरी हे आंदोलन असेच सुरु राहणार असुन आज लगेच ओबीसी कार्यकर्ता विजय बलकी यांनी आपल्या अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र शासन हे जरांगे पाटलांच्या आंदोलनाला एक न्याय देत असून ओबीसी च्या आंदोलनाला वेगळा न्याय असा प्रकार करीत आहे. असा आरोप




यावेळी ओबीसी सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष अनिल डहाके केला आहे. रविंद्र टोंगे यांना रुग्णालयात हलविण्यात येत असतांना ओबीसी महासंघाच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र शासनाविरोधात जोरदार नारेबाजी करीत आपला असंतोष व्यक्त केला.

# गाव तिथे भाजपा, घर तिथे कार्यकर्ता मोहीम राबविणार : राहुल मदने

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** प्रादेशिक पक्षांसह सगळे राष्ट्रीय पक्ष संपतील राहील फक्त भाजपा, लोकं काँग्रेसबाबत बोलतात. ४० वर्ष लागले तरी काँग्रेस भाजपासोबत उभी राहू शकत नाही. आत्ता भाजपा ज्या पद्धतीचा पक्ष आहे, तो दोन दिवसांत तयार झालेला नाही. हे सगळं संस्कारातून येतं आणि संस्कार कार्यालायतून येतो, आपल्या पक्षाची विचारधारा एवढी मजबूत आहे की नेते २०-२० वर्ष दुसऱ्या पक्षात राहिल्यानंतरही आपल्या पक्षात येत असल्याचे भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने यांनी सांगितले. मदने यांच्याकडे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पद असतानाही त्यांच्या कामाची पोहोचपावती म्हणून भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कामाची दखल घेऊन परवाच सोलापूर जिल्हा कार्यकारणी सदस्य पदी निवड केली आहे.सदर निवडीच्या संदर्भात मदने यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती.

गाव तिथे भाजपा व घर तिथे भाजपाचा कार्यकर्ता ही मोहीम माळशिरस तालुक्यासह जिल्हाभर राबवणार असून ज्या तरुण युवकांना भारतीय जनता पार्टीचे धोरणानुसार पक्षांमध्ये काम करण्याची इच्छा आहे.त्यांनी माझ्याशी संपर्क साधा असेही मदने यांनी आयोजित पत्रकार परिषदेच्या माध्यमातून परिसरातील तरुणांना आवाहन केले आहे.

# प्रकाश घुले यांची भाजपा किसान मोर्चा जिल्हा अध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुका चिंचखेडा ( खु ) येथी माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रकाश घुले यांची भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी घुले यांना किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र दिले.

प्रकाश घुले यांना कृषी उत्पन्न बाजार समितीचा दांडगा अनुभव असल्याने शेतकऱ्यांसोबत घुले यांची नाळ जुळली आहे म्हणून भारतीय जनता पार्टीने किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष पद बहाल केल्याने भारतीय जनता पक्षाला कन्नड तालुक्यामध्ये चांगलीच बळकटी मिळणार आहे. यावेळी पक्षाच्या केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार प्रशांत बंब अतुल सावे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, तालुका अध्यक्ष किशोर पवार यांनी अभिनंदन केले.

# पोळ्यानिमित्त जंगी कुस्त्यांचा आखाडा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील हिवरखेडा येथील ग्रामस्थांनी पोळा सणानिमित्य कुस्त्यांचा आखाडा भरवला. आखाड्यात चिखलठाण, कुंजखेडा परिसरातील व जिल्हाभरातून कुस्तीप्रेमी पहेलवानांनी सहभाग नोंदवला. अंतिम कुस्तीचे पारितोषिक ५००१/- रुपये स्व. अशोकराव पाटील मगर यांच्या स्मरणार्थ जाहीर करण्यात आले होते. यावेळी पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमी मोठ्या संखेत हजर होते. अंतिम कुस्तीचा सामना ओवर येथील पहेलवान इम्रान पठाण व कन्नड येथील पहेलवान विशाल यांच्यात अँड किरण मगर पाटील यांच्या हस्ते सामना लावण्यात आला. यावेळी हिवरखेडा येथील कुस्ती पंच कमिटीचे कदीर शेख, मिनाज शेख,रामकृष्ण मगर, युवराज मगर, मनोहर मगर, संजय मगर, माजीत शेख, वाजीद पठाण तसेच गुलाबराव मगर, बिलाल शेख, शरीफ हाजी, मकबूल शहा, भुरा शेख, कल्याण मगर व ग्रामस्थांनी कुस्ती आखाड्याचे नियोजन केले. कन्नड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीसांचा चोख बंदोबस्त होता.





# वैजापूरचे सायकलिस्ट मुंबईला रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्यात भरपूर पाऊस पडू दे,बळीराजा सुखाऊ दे,सर्वांना आरोग्यदायी जीवन लाभू दे,असे साकडे टाकण्यासाठी मुंबईच्या लालबागच्या राजाच्या चरणी प्रार्थना करण्यास वैजापूर येथील सायकलिस्ट व जलतरण ग्रुपचे बारा सदस्य शुक्रवार (ता.२२) रोजी मुंबईला दुपारी दोन वाजता रवाना झाले. या ग्रुपला नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, संजय बोरनारे, शिवसेना प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे, जयश्री कुंदे, धोंडीरामसिंह राजपूत, रणजित चव्हाण यांनी हिरवा ध्वज दाखविला. नाशिक येथील रॉयल रायडर क्लबने ही सायकल वारी आयोजित केली आहे.

या सायकल वारीतून "सायकल चालवा--आयुष्य वाढवा"देखना है कल -तो चालओ सायकल"सायकल चालऊ-आरोग्य वाढऊ"असा संदेश ही लोकांपर्यंत पोहचविणार आहेत, या सायकल वारीत सायकलिस्ट योगेश गाढे, बाबासाहेब जगताप, प्रशांत गायकवाड, ज्ञानेश्वर जाधव, भाऊराव म्हस्के, डॉ. ईश्वर अग्रवाल, नाना साळुंके,दि लीप अनर्थे, प्रवीण जाधव,जयराम खाडे, मोहन थोरात, व योगेश कुंदे असे बारा सायकलिस्ट आहेत त्यांना वैजापूर वाशीयांतर्फे निरोप देण्यात आला.

# इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेतर्फे निरंतर डेंटल अभ्यासाच्या कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथे हॉटेल नर्मदा हॉलीडे येथे दि.१७ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. आरती पाटील या उपस्थित होत्या प्रमुख अतिथी म्हणून मुंबई येथील डॉ. मनीष अग्रवाल ( एम डी एस प्रोस्थोडॉण्टिस्ट ) हे होते. सुरुवातीला दीप प्रज्वलन करून धन्वन्तरी चे पूजन करण्यात आले. सौंदर्यशास्त्र म्हणजे एस्थेटिक डेन्टिस्ट्री या शाखेने दंतवैद्यकशास्त्रात एक नवी क्रांती आणली. त्यानंतर कॉस्मेटिक डेन्टिस्ट्री, स्माईल डिझायनिंग, लॅमिनेटस, व्हिनियर्स अशा ब-याच नवनवीन उपचारपद्धती अस्तित्वात आल्या. कॉस्मेटिक डेन्टिस्ट्रीमध्ये दातांना जर फटी असतील किंवा दात तुटलेले असतील विशेषतः समोरच्या बाजूचे तर अशा प्रकारचे सर्व व्यंग सहजरीत्या ठिक केल्या जातात. स्माईल डिझायनिंगमध्ये जर तुमचे हास्य तुम्हाला छान करायचे असले तर त्या प्रकारचे उपाय केले जातात. डॉ मनीष अग्रवाल यांनी प्रोस्थेटिक ट्रीटमेंटच्या साहाय्याने क्राऊन्स, लॅमिनेट्स, आर.पी.डी., कास्ट पार्शल डेंचर , इम्प्लांट्स यांचा उपयोग करून दातांचे सौंदर्य कसे खुलवता येईल यावर या विषयावर सादरीकरण केले. संचलन डॉ गीतिका सदावर्ते यांनी तर आभारप्रदर्शन डॉ सचिन किनगे यांनी केले. डॉ मनीष अग्रवाल यांचा स्मृतिचिन्ह व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेचे अध्यक्ष डॉ. शरद जुमडे, सचिव डॉ. सचिन किनगे व इतर मान्यवर डॉक्टर्सची उपस्थिती होती.

# भाजप कन्नड तालुका अध्यक्षपदी किशोर पवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुका भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्षपदी जिल्हा परिषद सदस्य किशोर पवार यांची निवड करण्यात आली आहे, तसेच सहकार महर्षी स्व नारायण पवार यांचे पुत्र असून किशोर पवार यांनी चापानेर व हतनूर गटात आपली 25 ते 30 वर्षांपासून पकड मजबूत केलेली आहे.

सध्याचे भाजप पक्षात मोलाची जबाबदारी घेऊन पक्षाचे काम करून पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहे म्हणून पक्षाच्या केंद्रीय राज्यमंत्री डॉभागवत कराड केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेमाझे विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे आमदारप्रशांत बंब अतुल सावे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या नेतृत्वाखाली पवार यांची भाजप तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली .

# श्रीरामपूर दरोडा प्रकरणाला धक्कादायक वळण

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अहमदनगरमधील दरोड्याच्या गुन्ह्याला आता वेगळे वळण लागले आहे. सतत होणाऱ्या शारीरिक त्रासाला कंटाळून पत्नीनेच पतीला दुधात झोपेच्या गोळ्या देऊन नंतर साडीच्या साह्याने पतीचा गळा आवळून संपवल्याचा धक्कादायक प्रकार अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील एकलहरे येथे पोलिसांनी उघडकीस आणला आहे. विशेष म्हणजे पत्नीने दरोड्याचा बनाव रचत दरोडेखोरांनी आपल्या पतीची हत्या करत ७ लाखांची रोकड घेऊन लंपास झाल्याचा बनाव केला होता.याबाबत अधिक माहिती अशी की,२१ सप्टेंबर रोजी रात्री पावणे दोन वाजेच्या सुमारास कोल्हार रोड, एकलहरे शिवार येथे नईम रशिद पठाण यांचे घरी दरोडा पडला असुन त्याचे घरुन सात लाख रु. रोख रक्कम व काही दागिने चोरी गेले आहेत, सदर दरोड्यामध्ये नईम पठाण यांना साडीच्या साहयाने गळफास लावुन जिवे ठार मारले आहे आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी आहे तरी तात्काळ मदत पाठवा असा श्रीरामपुर पोनि. हर्षवर्धन गवळी यांना कॉल आला. पोनि. गवळी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन तत्काळ तपास पथक व अधिकारी अंमलदार याचेसह सदर घटनास्थळी जावुन पाहणी केली आणि जखमींना तात्काळ औषध उपचाराकरीता पाठवून दिले. सदर घटनेबाबत वरिष्ठांना माहिती दिली. सदर घटनेबाबत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करुन पुढील तपास चालु केला. तसेच एस.पी. राकेश ओला यांचे आदेशाने एल्सीबी पोनि. दिनेश आहेर हे पथकासह सदर गुन्हाचा समांतर तपास करण्यासाठी घटनास्थळी हजर झाले. सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा अहमदनगर व श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन यांचा तपास चालू असताना, सदर घटनास्थळी तांत्रिक विश्लेषण करुन तसेच सदर दरोड्यात मयत झालेला नईम रशिद पठाण याची जखमी पत्नी हिचे जाब जबाब घेतले असता आणि गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेतली असता सदरचा गुन्हा हा दरोडा नसून मयत नईम पठाण याची पत्नी बुशरा नईम पठाण (रा.एकलहरे) हिने केला असलेबाबत समजल्याने तिस मयत नईम रशिद पठाण याचा अंत्यविधी होताच चौकशीसाठी ताब्यात घेतले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली तलावांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराला पाणीपुरवठा करणारा नकाणे तलाव, हरणमाळ तलाव तसेच अक्कलपाडा धरणावरील उजव्या कालव्यावरील गोताणे, उडाणे येथील पाझर तलावाची आज जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी पाहणी केली.

सद्यस्थितीत नकाणे तलावात कमी पाणीसाठा असल्यामुळे धुळे शहरातील पिण्याचे पाण्याची गरज भागविण्यासाठी हरणमाळ तलावातून नकाणे तलावात पाणी सोडण्यात आले असून या पाण्यामुळे नकाणे तलावातील पाणी पाणीपातळी वाढ होत आहे. हरणमाळ तलावाची पाणी पातळी कमी झाल्यावर त्यात एक्स्प्रेस कॅनॉलने पाणी सोडण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी उडाणे गावातील गावकरी, संबंधीत लोकप्रतिनिधी तसेच जलसंपदा कार्यालयातील अधिकाऱ्यांशी कालवा आवर्तन तसेच गावकऱ्यांच्या समस्याबाबत चर्चा केली. उजवा कालवा लाभक्षेत्रातील सर्व गावात पाझर तलाव व कालव्याद्वारे पुरेशा प्रमाणात आवर्तन चालू असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. सद्यःस्थितीमध्ये उजव्या कालव्यावरील उडाणे पाझर तलाव भरला असून त्यापुढील सांजोरी तलाव नंतर कुंडाणे पांझर तलाव भरुन त्यानंतर एक्स्प्रेस कॅनॉलने हरणमाळ तलावात पाणी सोडण्यात येणार आहे. यावेळी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता पी.जी. पाटील, कार्यकारी अभियंता वट्टे, सहाय्यक अभियंता गोताणे, शाखा अभियंता महाले, खैरनार उपस्थित होते.



# जळगाव जिल्ह्यातून चार गुन्हेगार हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर चार गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक एम. राजकुमार यांनी काढले आहेत. नशिराबाद आणि धरणगाव येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टोळीप्रमुख शेख मुश्ताक (४२), आरिफ शेख (२४), असलम खान (३०, सर्व रा. कुरेशी मोहल्ला) यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यासह नशिराबाद, जामनेर, भुसावळ बाजारपेठ, धरणगाव, पहूर, चाळीसगाव, तसेच नशिराबाद, चाळीसगाव येथील रेल्वे पोलीस ठाण्यात आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्यांच्या हद्दपारीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला होता. यासोबतच एरंडोल तालुक्यातील कासोदा येथील पोलीस ठाण्यात अमीन शेख (रा. उत्राण, एरंडोल) याच्याविरुद्ध चार गुन्हे तसेच दोन प्रतिबंधक कारवायाही करण्यात आल्या होत्या. तरीही त्याच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने हद्दपारीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या चारही गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

# तहसीलच्या मागील जागेत चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

## 1,77,800 रुपयांचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्य जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तहसील कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या शिवारात तीरट नावाचा जुगार पैसे लाऊन खेळत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना मिळाली. लगेच त्यांनी उपरोक्त ठिकाणी कार्यवाहीसाठी पथक पाठवून चालू आसलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकत सुमारे 177800 रुपयांचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्य जप्त केले असून 7 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील अवैध धंदे व जुगाराचे अड्डे बंद करण्यासाठी पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून सातत्याने प्रत्येक ठिकाणी धाडी टाकून गुन्हे दाखल केले जात आहे. धर्माबाद तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या शिवारात तिरट नावाचा जुगार पैसे लाऊन खेळत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना कळताच त्यांनी उपरोक्त ठिकाणी कार्यवाहीसाठी पथक पाठवून धाड टाकली त्या ठिकाणी एकूण 22 हजार 800 रुपये नगदी, चार मोटार सायकल व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले व जुगार खेळणारे व खेळविणारे अशा एकूण 7 जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम 12 (अ) प्रमाणे धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही सहायक पोलिस निरीक्षक बालाजी महाजन, सहायक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर, उमेश कारामुंगे, संतोष अनेराव, सुपारे, इंजपवाड यांच्या पथकाने ही कार्यवाही केली आहे.

# तीन गायींसह बैलाची चोरी; शेतकऱ्यांत भीती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील एका शेतातील गोठ्यातून तीन जर्सी गायींसह एक बैल चोरीस गेला. ही नाही. घटना मंगळवारी (दि. १९) पहाटे उघडकीस आली.

कडुबा रामचंद्र म्हस्के (५२ रा. वडोदबाजार) यांची पीरबावडा रोडलगत गट नं. १२८ मध्ये शेती आहे. या शोतात रोडला लागूनच त्यांनी जनावरांचा गोठा बांधलेला आहे. येथे त्यांनी तीन गायींसह बैल व सहा महिन्यांची लहान वासरी बांधलेली होती. सोमवारी संध्याकाळी ते सर्व जनावरांना चारा पाणी करून झोपण्यासाठी घरी गेले.

जनावरांना चारा पाणी व गायीचे दूध काढण्यासाठी शेतात आले असता त्यांना जनावरे दिसले त्यांनी आसपासच्या परिसरात शोध घेतला परंतू ती मिळून आली नाहीत. एकूण २ लाख २० हजारांची ही जनावरे होती. चोरट्यांनी पूर्ण गोठाच साफ केल्याने म्हस्के यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. या प्रकरणी वडोदबाजार पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक विलास मोरे या घटनेचा तपास करीत आहे वडोद बाजार येथील परिसर या मधी शेतकऱ्यांच्या मनामध्ये जनावरे चोरीची गेल्यामुळे दोस्ती निर्माण झाली.



# देवळगाव गुजरी येथे वृत्तसंकलानासाठी गेलेल्या पत्रकाराला केली मारहाण

## गावगुंडावर पहूर पोलिसात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील देवळगाव गुजरी येथे गणपती बाप्पा उत्सव निमित्ताने भर रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी वृत्तसंकलनासाठी गेलेल्या संजय जटाळे पत्रकाराला मारहान करुन शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिली.

मी पत्रकार संजय जटाळे अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समीतीचा तालुका अध्यक्ष जामनेर दि. १९ रोजी रात्री ८.३० चे सुमारास देऊळगांव गुजरी येथील सार्व. गणेश स्थापने संदर्भातील वृत्तसंकलनाचे काम करीत असताना सुमारे शेकडो लोकांच्या जमावात गावतील गावगुंड संदीप त्र्यंबक चौभे हा इसम दारु पिऊन काही एक कारण नसताना माझे अंगावर येऊन मला मारहाण करून मी तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. शेकडो लोकांच्या जमावामधे सार्वजनिक कार्यक्रमात धिंगाणा घालणे, शिवीगाळ व मारहाण करणे असा या गावगुंडाचा नेहमीचा त्रास आहे. या अगोदर शिवजयंतीचे वृत्तसंकलनावेळी सुध्दा याने याच प्रकारे मला कॉलर पकडुन व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती. तुझ्या सारखे अनेक पत्रकार पाहीले, तुझ्या कडुन जे होईल ते करून घे, माझे कोणीही काही वाकडे करु शकत नाही अशा प्रकारची धमकी याने या अगोदर दिली होती. त्यामुळे मी या संदर्भात स्थानिक पोलीस स्टेशनला माहिती देऊन अगोदरच एनसीआर दाखल केलेली आहे. काल सार्वजनिक ठिकाणी या गावगुंडाने माझे अंगावर येऊन मला मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन तुला कुठेही दिसला तर जिवे मारण्याची धमकी सुध्दा दिली आहे.याची माझे सोबत सार्व. ठिकाणी धिंगाणा घाल्यण्याची दुसरी वेळ असुन याचे पासुन माझे जिवीत्वास धोका निर्माण झाला आहे. गावात अनेक ठिकाणी सार्वजनिक कार्यक्रमात याने बरेच वेळा कायदा सुव्यस्थेला गालबोट लावण्याचे कृत्य सदर संदीप चोभे नावाचा गांवगुड दारु पिऊन नेहमी करीतच असतो. याबाबत आपण प्रत्यक्ष सार्व ठिकाणी गणेशोत्सव कार्यकर्ते व पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत सदर गुंडावर कारवाई करावी अशी माहिती स्थानिक पोलीस स्टेशनला देऊन गुन्हा दाखल करण्यात आला असून सार्व ठिकाणी सततच्या उपद्रव प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून कायमचा बंदोबस्त करावा.अशी तक्रार संजय जटाळे यांनी सदर इसमाच्या विरोधात दिली आहे. अशा गावगुंडांवर सर्वांनीच लक्ष ठेवून त्याचा बंदोबस्त लावलाच पाहिजे अशी सुद्धा मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय संघटक अरुण चव्हाण, मराठवाडा विभागीय सरचिटणीस गोकुळसिंगदादा राजपूत, विभागीय अध्यक्ष दादासाहेब काळे, जिल्हाध्यक्ष प्रदीप जगताप, तसेच जळगाव जिल्हा अध्यक्ष शीलाताई या सर्व पदाधिकाऱ्यांनी केलेली आहे.

# आ. सतीश चव्हाण यांची महाविद्यालयास भेट

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथील राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, घोडेगाव राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय येथे आज मराठवाडा पदवीधर संघाचे आमदार माननीय सतीश भाऊ चव्हाण व माजी आमदार कैलास पाटील यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून साईनाथ पाटील जाधव साहेब हे होते. तर मुख्य अतिथी मराठवाडा पदवीधर संघाचे आमदार माननीय सतीश भाऊ चव्हाण, माजी आमदार कैलास पाटील, महेश उबाळे, द्वारकादास पाटील जाधव हे होते.

प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सतिश भाऊ चव्हाण व कैलास पाटील साहेब यांचे स्वागत साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले. त्यानंतर सतीश चव्हाण साहेबांचे भाषण झाले.त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. विविध विषयांवर प्रश्न विचारले.त्यांनी महाविद्यालयास सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. अभ्यासिका व कॉम्पुटर लॅब देण्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती. ठाकूर मॅडम यांनी केले . नंतर मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# भिक्षा मागणाऱ्या जखमी बालकासाठी सरसावले समतोल प्रकल्पाचे सदस्य

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** २१ सप्टेंबर २०२३ रोजी जळगावच्या रेल्वे स्टेशनवर आपल्या केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रदिप पाटील , यांना आऊटरीच करीत असतांना कर्तव्यावर असताना दोन बालके भीक मागताना दिसली. समतोल प्रकल्प व्यवस्थापक श्री. प्रदिप पाटील व सहकारी कु. रविना भगत यांनी तात्काळ या दोघं बालकांना समजावून स्टेशनवरील समतोल प्रकल्प बाल सहायता केंद्र या ठिकाणी आणलं आणि त्यांच्याविषयी विचारपूस केली. विचारपूस करताना कळले की दोन्ही मुलं सख्खे भाऊ असून घरची परिस्थिती गरिबीची असल्याने ते रोज गावात येऊन भीक मागून आपला उदरनिर्वाह करतात. पुढे बालकांशी संवाद साधताना कळले की लहान भावाला बारा दिवसांपासून पायाला एक मोठी जखम झालेली आहे. या लहान बालकाची हृदयद्रावक कहानी समजल्यानंतर आपल्या समतोल प्रकल्पाच्या सहकाऱ्यांनी या बालकाला धीर देत तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. रूग्णालयात बालकाच्या जखमेवर उपचार करण्यात आले. या बालकाच्या पायात काच घुसल्याने जखम झाली होती आणि एवढे दिवस काचेचा तुकडा पायातच राहिल्याने जखम चिघळली होती. डॉक्टरांनी इंजेक्शन देऊन पायात घुसलेला काच काढला आणि जखमेला मलमपट्टी केली. यानंतर डॉक्टर म्हणाले की, "या मुलाला झालेल्या जखमेवर वेळेवर उपचार न झाल्यामुळे जखमेमध्ये विष तयार व्हायला सुरुवात झाली होती, पाय सडण्याची शक्यता होती आणि जर अजून उशीर झाला असता तर कदाचित पाय तोडावा लागला असता. पण आता वेळेवर उपचार झाल्याने काही काळजी करायची गरज नाही." डॉ.सांगितले आपल्या समतोल प्रकल्पाने पुन्हा एकदा माणुसकीचे दर्शन घडवत एक आदर्श प्रस्थापित केला आहे.



# अवैध दारु विक्री बंदीसाठी पोलीस निरीक्षकांना निवेदन

## बोथी गावातील बेकायदा दारू विक्री बंद करावी

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** तालुक्यातील बोथी गावात अवैध दारू विक्रीमुळे गावातील नागरिक,तरुण, युवा मुले दारुच्या आहारी जाऊन अनेक संसार उध्वस्त होऊन बर्बाद झाले आहेत. बोथी गावातील बेकायदा दारू विक्री बंद करावी, हया मागणीसाठी येथील महिलांनी यलगार पुकारला असून दारूची बाटली आडवी करण्यासाठी १६ सप्टेंबर रोजी बोथी येथील महिलांनी पोलिस स्टेशन येथे पोलिस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे यांना निवेदनाव्दारे मागणी केली आहे. उमरी तालुक्यातील बोथी गावासह इतर अनेक गावात बीट जमादार पोलिस यांच्या मुक समतीने बेकायदा दारू विक्री राजरोस पणे विक्री चालू असुन.त्यामुळे महिलांना त्रास होत असून दारूमुळे गावात भांडणे तंटे वाढले असून सामाजिक शांतता धोक्यात आली आहे. सदर बेकायदा दारू विक्री बंद करावी, अशी मागणी १६सप्टेंबर रोजी येथील महिलांनी उमरी पोलिस स्टेशनला दिलेल्या निवेदनाव्दारे अशी मागणी केली आहे. याबाबत पोलिस निरीक्षक विश्वनाथ झुंजार यांना निवेदन सुध्दा देण्यात आले. बोथी येथे बेकायदा दारू विक्री सुरु आहे, या दारु विक्री मुळे घरघुती तंटे निर्माण होत आहे. ही दारू विक्री सुरु असल्याने



कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो तसेच कौटुंबिक हिंसाचार वाढला आहे. महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी बोथी गावातील बेकायदा दारू विक्री बंद करावी, या मागणीसाठी पोलीस स्टोशनमध्ये या संदर्भात दारुविक्री बंदीसाठी देण्यात आले. यावेळी हजारो महिलांची उपस्थिती होती. गावात काही भागात हातभट्टी व सिंधी बेकायदा दारू विक्री सुरु असल्याचे निवेदन देण्यात आले या संदर्भात बेकायदा व अवैध दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल, यापुढे हातभट्टीवर धाडी टाकल्या जाईल असे आश्वासन पोलिस निरीक्षक झुंजारे यांनी दिले आहे.

# महादेवाच्या पिंडीला काजू, बदाम, मनुका, ओल्या खारकेचा साज शृंगार

## १२ महिन्यांपासून अखंड जप, पूजा, महाआरती

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील पेठ विभागातील शिव भाविक भक्त गेल्या १२ महिन्यांपासून जप, पुजा, अभिषेक, महाआरती, महाप्रसादासह येथील अनेक महादेव मंदिरातील पिंडीची बेल, फुलांची साज सजावट करून विविध धार्मिक ऊपक्रम राबविण्यात येत असून येथील करपरा नदी तीरावरील नृसिंह महादेव मंदिरातील महादेव पिंडीवर दि.२१गुरुवार रोजी नृसिंह महादेव मंदिरातील महादेव पिंडीवर काजू, बदाम, मनुका, ओली खारीक याचा शृंगार करून अभिषेक करण्यात आला आहे.
हे सर्व कार्यक्रमास येथील प्रल्हादआप्पा पातरफळे, उत्तम घाटूळ, नारायण तमशेटे, संदेश भुते, योगेश तमशेटे, आकाश राठोड, कपिल तमशेटे, गौरव तमशेटे, अशोक मुंजे, प्रभू घाटूळ सुशांत फटके यांच्यासह येथील महीला व पुरुष सर्व शिव भाविक भक्त उपस्थित होते.



# चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मूल तालुक्यातील ताडाळा येथील शेतात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक केलेल्या हल्ल्यात शेतकरी ठार झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. सूर्यभान टिकले (५५) रा. चिचाळा असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. सकाळी सात वाजताच्या सुमारास सूर्यभान हा आपल्या शेतात पाहणी गेला असता दबा धरून बसलेल्या एका वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात शेतकऱ्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. सदर घटना गावात माहिती होताच घटनास्थळी लोकांनी एकच गर्दी केली होती. वनविभागाला ही माहिती देण्यात आली असून वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात ठार केल्याच्या घटना वारंवार घडत असून वन्य प्राण्यांचा संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे.

## पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांचा उपक्रम

# गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रथमच धर्माबाद शहरावर राहणार सीसीटीव्हीची निगराणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणाकर**

**धर्माबाद :** शहरातील गणेशोत्सव शांततेत निर्विघ्नपने पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्षम झाली असून पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या प्रयत्नामुळे प्रथमच शहरात २४ ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून श्री विसर्जन मार्गासह मुख्य चौक व प्रमुख मार्गावर या कॅमेराची निगराणी राहणार आहे. आतापर्यंत अनेक वेळा शांतता समितीच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला गेला पण ते कृतीत आणण्यासाठी प्रयत्न झाले नव्हते. कर्तव्यदक्ष व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून पोलीस दलात ओळखले जाणारे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी मात्र हा विषय मनावर घेत २४ ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविले असल्याने त्यांच्या या वेगळ्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

धर्माबाद शहराची भौगोलिक रचना पाहता शहरांतील प्रत्येक घटना घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेऊन कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावे अशी मागणी अनेक वेळा झाली होती पण नगर परिषदेने शांतता समिती बैठक किंवा उत्सव संपन्न होताच याकडे सोईने दुर्लक्ष करीत असे. शहरात नगर पालिकेस जनतेकडून वेगवेगळ्या करांच्या माध्यमातुन महसूल प्राप्त होतो मग शहराच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या या सूचनेकडे दुर्लक्ष करण्यामागचे कारण काय हे मात्र अद्याप स्पष्टपणे कळू शकले नाही.

नुकत्याच पार पडलेल्या शांतता समितीच्या बैठकीत अप्पर पोलीस अधीक्षक डॉ खंडेराव धरणे यांनी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्या संदर्भात पोलीस दलाची भूमिका स्पष्ट केली होती आणि लगेचच ती योजना पोलिश निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी कृतीत आणली असल्यामुळे यंदाचा गणेशोत्सव प्रथमच सीसीटिव्ही कॅमेरे यांच्या निगराणीत पार पडणार हे विशेष.

कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी गणेशोत्सव निर्विघ्नपने पार पडण्यासाठी पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी घेतलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे जनतेत कौतुक होत आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत संपते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे प्रत्येक घटणा घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेऊन आहेत. श्री विसर्जन मार्ग, विसर्जनाचे ठिकाण इत्यादि बाबींची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचनाही संबधीत विभागास देन्यात आले आहेत. धर्माबाद तालुक्यातील



शहरात बसविण्यात आलेले 24 कॅमेरे हे पोलीस प्रशासनाने बसविले आहेत त्यामूळे प्रत्येक घटना घडामोडी वर लक्ष ठेवण्यासाठी खूप उपयुक्त ठरणार आहेत . शहरात पोलीस निरिक्षक अभिषेक शिंदे यांच्या प्रयत्नाने हा स्तुत्य उपक्रम कृतीत आला आहे . शहराची वाढती व्याप्ती घडणारे प्रकार पाहता नगर परिषद प्रशासनाने ही कॅमेरे कायमस्वरूपी बसविल्यास एक वेगळा व नवा पॅटर्न दिसून येईल . सद्या नगर पालिकेत प्रशासक राज असल्याने जनतेत जे लोकप्रतिनिधी करू शकले नाही ते प्रशासनाने करून दाखवले असा सूचक व सकारात्मक संदेश राहील हे विशेष

गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी एक उपविभागीय पोलिस अधिकारी , एक पोलीस निरीक्षक,दोन सहायक पोलिस निरीक्षक, चार पोलीस उप निरीक्षक तसेच नियमित 50 पोलिस कर्मचारी यांच्यासह बाहेरून आलेले एक पोलीस उप निरीक्षक व 15 कर्मचारी व 20 ग्रह रक्षक दलाचे जवान अशी पोलीस यंत्रणा सज्ज आहे.

# लोणार न.प.ने करावरती व्याज लावण्याचा ठराव रद्द करून विकासकामे मार्गी लावावी

## अन्यथा वंचितच्या वतीने जनआक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** गेल्या दोन ते तीन वर्षापासून कोरोनाची सावट चालू होते त्यातच शहरामध्ये कुठेही औद्योगीकरण झालेले नाही. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगाना काम धंदा सुद्धा नाही. त्यामुळे करवाढीवर घेतलेला व्याजाचा निर्णय रद्द करण्यात यावा व सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शहरांमध्ये अनेक ठिकाणी घानीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे मच्छराचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. त्यासाठी प्रत्येक वार्डामध्ये धूर फवारणी करून नाली उपसा करण्यात यावा लोणार शहराला पाणीपुरवठा करणारी नळ योजनेद्वारे पाणीपुरवठा होतो तो दीड ते दोन महिन्या मधून एकदा होतो. तोही दूषित त्यामुळे पाणीपुरवठा हा एक दिवसाआड म्हणजे तिसऱ्या दिवशी शुद्ध पाणी नागरिकांना देण्यात यावे. वार्डातील विद्युत पोल वरती असलेले पथ दिवे हे बंद झाले आहे ते त्वरित त्या ठिकाणी पथदिवे लावण्यात यावे. मागासवर्गीयांचे स्मशानभूमी मध्ये लाईटची व्यवस्था करण्यात यावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जनआक्रोश मोर्चा करण्याचा इशारा देण्यात आलेल्या निवेदनात मुख्याधिकारी लोणार यांना देण्यात आला. यावेळी वंचित नेते नागवंशी, संगपाल पनाड, ता. महासचिव बळी मोरे, ता. महासचिव सुनील इंगळे, शहराध्यक्ष फिरोज भाई पठाण, दीपक अंभोरे, महेंद्र मोरे, मुरलीधर मोरे हे उपस्थित होते.



# बुलढाण्यात पावसाचे पुनरागमन; पाच मंडळात अतिवृष्टी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** दडी मारलेल्या पावसाने दमदार पुनरागमन करीत लाखो हेक्टरवरील खरीप पिकांना नवसंजीवनी दिली! यामुळे पंचविस लाख जिल्हावासीयांना मोठ्ठा दिलासा मिळाला आहे. गणेशोत्सव काळात हमखास पाऊस पडतो ही जिल्हावासीयांची श्रद्धा खरी ठरली. गौरी आगमनाला गुरुवारी रात्री जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. बहुतेक ठिकाणी रात्रभर संमिश्र पाऊस कोसळत राहिला. बुलढाणा ५६ मिमी , चिखली ३७,मेहकर ५०.४ मिमी, मलकापूर ६० ,मोताळा ४३.३ मिमी,जळगाव जामोद ३५ , या तालुक्यात दमदार पावसाने हजेरी लावली. उर्वरित तालुक्यात १२ ते २९ मिलिमीटर दरम्यान पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील पाच महसूल मंडळात अतिवृष्टी चे थैमान अनुभवायास मिळाले. जळगाव तालुक्यातील जळगाव मंडळात ८७.२५ मिमी, मेहकर तालुक्यातील कल्याणा मंडळात ८५.२५ मिमी, शेगाव तालुक्यातील शेगाव मंडळात ८४.५० मिमी, मलकापूर तालुक्यातील मलकापूर व धरणगाव मंडळाला प्रत्येकी ७२.७५ मिमी इतक्या कोसळधार पावसाने झोडपले.

9130174444
हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# ठाणे येथे मॅको बँकेची शाखा लवकरच स्व-मालकीच्या जागेत

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय बँक म्हणून प्रसिद्ध असलेली मंत्रालय अँड अलाईड ऑफिसेस को-ऑप (मॅको) बँकेची ठाणे शाखा लवकरच स्वतःच्या जागेत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयालगत स्थलांतरीत होणार आहे.

आज या जागेची खरेदी नोंदणी सहनिबंधक कार्यालय, ठाणे येथे करण्यात आली. ही बँक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील बाजूस, कंपाउंड लगत, श्यामकमल को.ऑप. हाऊसिंग सो.लि., ऑफिस क्र.3 व 4, पहिला मजला, कडवा लेन, साईबाबा मंदिर जवळ, ठाणे(प.) 400601 येथे लवकरच सुरू होत आहे.

आज या जागेच्या खरेदी नोंदणीसाठी बँकेचे अध्यक्ष प्रमोद पंडित, उपाध्यक्ष श्री.सुनील खाडे, संचालिका श्रीमती मंगल नाखवा, तसेच कर्मचारी प्रतिनिधी (संचालक) श्री.समीर तुळसकर, श्री. भगवान पाटील,कर्मचारी सहदेव बने हे उपस्थित होते. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्वांनी बँक कार्यरत होण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामाची पाहणी केली.

ही बँक सुरू झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी अतिशय उत्तम बँकिंग सेवा-सुविधांचा लाभ मिळू शकेल तसेच स्टॅम्प पेपर, फ्रँकिंग सुविधा देखील सुरू करणार असल्याचे बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्री.प्रमोद पंडित व उपाध्यक्ष सुनील खाडे यांनी सांगितले. याबरोबरच अहमदनगर, नाशिक, पालघर आणि पुणे येथेही मंत्रालय बँकेच्या शाखा या महिनाभरातच सुरू होत आहेत.

# उमरी तालुक्यातील अवैध धंदे बंद करा अन्यथा उपोषणास बसणार

## कांचन लक्ष्मण ऊमाटे भ्रष्टाचार नि. सं. स. तालुकाध्यक्षा

आधुनिक केसरी न्यूज



**उमरी :** तालुक्यातील सर्व अवैध धंदे कायमस्वरूपी बंद करण्यात यावे यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकासह विविध सरकारी ऑफिस मध्ये निवेदन देऊन उपोषणास बसण्याच्या इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. तालुक्यातील अनेक खेड्यामध्ये रात्रंदिवस खुलेआम अवैद्य दारूची विक्री फार मोठ्या प्रमाणात होत आहे मटका, गुटखा खुलेआम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. प्रत्येक पान टपरीवर गुटखा, खरा खाताना युवक दिसत आहेत हे सर्वधंदे कायमस्वरूपी बंद करून संबंधित अवैध धंदे चालकाविरुद्ध कारवाई करण्यात यावी तसेच महिला शाळकरी मुले मुली या रस्त्याने जाणे येणे करतात तसेच शाळकरी मुले मटका लावण्याकडे वळताना दिसत आहेत शेतकरी गोरगरीब सुद्धा मोठ्या प्रमाणात मटका जुगाराकडे वळल्या जात असल्याचे दिसून येत आहेत तसेच पुढे गणपती, ईद-ए-मिलाद, दुर्गादेवी उत्सव, दसरा, दिवाळी असे अनेक प्रकारचे सण येत आहेत. असे पुढे गैरप्रकार घडू नये म्हणून हे चालू असलेले अवैध धंदे तत्काळ बंद करावे सामान्य नागरिकांची होणारी लूट थांबवावी अन्यथा उपोषणास बसणार आहे असे आखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समीतीचे तालुकाध्यक्षा कांचनताई लक्ष्मण ऊमाटे यांनी प्रतिनीधीशी बोलताना सांगीतले, उमरी शहरात मछी मार्केटमधील छोट्या छोट्या खोलीत मटक्याचे दुकान टाकून संसार थाटला गल्लो बोळीत, केळाची बंडी, चहा हॉटेल, विविध दुकाने याठिकाणी खुलेआम अवैद्य मटका जुगार चालु आहे. तर पानटपरी गोळ्या बिस्कीट दुकानात गुटखा व अवैद्य देशी विक्री होत असून याकडे प्रशासन मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून आपली पोळी भाजून घेत आहे. गोरगरीब या व्यसनाच्या आहारी जाऊन एक वेळची खाण्यास पोळी भेटत नाही याकरीता तालुक्यात चालणारे अवैद्य धंदे बंद करा अन्यथा उपोषणास बसणार आखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समीतीचे तालुकाध्यक्षा कांचनताई लक्ष्मण ऊमाटे यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले आहे. यावेळी, रामदास गिरे पाटील, गजानन गव्हाणे, प्रतिभाताई कपाटे, आकाश घोरबांड, बाबुराव क्षीरसागर, सोनाली ढवळे बालाजीराव शिंदे रामखडक, बाबुराव पिटलेवाड यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# उसावरील निर्यात बंदी हटवा; नसता ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे तीव्र आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ऊसावरील निर्यात बंदी सरकारने विनाशर्त हटवावी नसता तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केले आहे. ऊस गाळप राज्यात साखर कारखाने सुरू होण्यापूर्वीच सरकारने राज्यातून ऊस निर्यात बंदी घालण्याची घोषणा केली. राज्यात वर्ष २०२३-२४या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड करून उसाचे मोठे उत्पन्न घेतले आहे व यंदा उसाला चांगले भाव मिळण्याची शक्यता आहे. त्यात ऊसगाळप ऊस कारखाने सुरू होण्यापूर्वीच निर्यात बंदी करण्याची घोषणा राज्य सरकारने अचानक केल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना धक्का बसला आहे. दुष्काळत तेरावा महिना असी गत सद्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची झाली आहे. यंदा एकतर पाऊस नाही त्यात नव्याने सरकारचा दबाव ऊस निर्यात बंदी आणुन सरकारने सदर निर्णय परत घेवून ऊस निर्यात बंदी हटवावी नसता ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील असा इशारा देण्यात आला आहे. यावर अमरदिप नलावडे, कृष्णा नलावडे, शिवाजी चंदनसे, बाबासाहेब नलावडे, राजु गिरी यांच्या सह्या आहे.



# गंगा महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश अभियान

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून कुंबेफळ येथील गंगा महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश अभियान  राबवण्यात आले. कवी कालिदास विद्यापीठाचा वर्धापन दिन कुंबेफळ येथील गंगा  महाविद्यालयात  विद्यापीठाचा ध्वजारोहण करून  व मेरी मिट्टी मेरा देश  अभियान राबवून  मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

वरील कार्यक्रमा दरम्यान  महाविद्यालयात  शिकत असणाऱ्या मराठवाड्यातील  ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गावातील माती आणून अमृत कलश स्थापन केला अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी  विद्यापीठाचा  वर्धापन दिन अत्यंत आगयावेगळ्या रीतीने  साजरा केला. अमृत कलश यात्रेला केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री यांच्या उपस्थितीत 1 सप्टेंबर पासून दिल्ली इथून सुरुवात झाली आहे संपूर्ण भारतात आज  अमृत महोत्सव अंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश अभियानाला 15 ऑगस्ट पासून सुरुवात झाली असून त्या अंतर्गत प्रत्येक जिल्हा व तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन  एका कलशामध्ये माती व तांदूळ एकत्र करत आहेत. सदरील उपक्रमाला अनुसरून गंगा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी  आपापल्या गावातील माती आणून  अमृत कलश तयार केले आहेत  हे अमृत कलश मुंबई येथे पाठवले जाणार आहेत. तदनंतर नंतर या अमृत कलाशातील माती व तांदूळ एका मोठ्या कलशामध्ये मुंबई येथील क्रांती मैदान येथे एकत्रित करण्यात येणार आहेत .मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भव्य दिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करून स्वयंसेवक सदर अमृत कलश रेल्वेने दिल्लीला घेऊन जातील त्यासाठी विशेष रेल्वेच्या आयोजन करण्यात आले आहे संपूर्ण देशातून आलेली माती महान  शहिदांच्या स्मृती पित्यर्थ अमृत वाटिका निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. सदरील वर्धापन दिनाच्या  कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शन म्हणून कवी कालिदास संस्कृत विश्व विद्यापीठाचे कुलगुरू माननीय हरेराम त्रिपाठी, कुलसचिव डॉ.रामचंद्र जोशी,  एन एस वाय चे समन्वयक  डॉ. जयवंत चौधरी यांचे  बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच प्रमुख  पाहुणे म्हणून  सीमा गाडेकर उपकार्यकारी अभियंता महापारेषण छत्रपती संभाजी नगर यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाचे संचालक श्री आर.के खंडेलवाल यांनी कार्यक्रमाचे अत्यंत सुंदर नियोजन करून  विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य कुशल पाटील, विश्वजीत पाटील, नारायण तांबे,  कृष्णा खंडेलवाल, सुमेध गवई, पुंजे, स्मिता वाणी, बनकर मॅडम, तेजश्री कुलकर्णी मॅडम, ढाके मॅडम, पवार मॅडम, काकडे सर इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन वायकोळे मॅडम यांनी मांडले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर